महाराष्ट्र शासन

## ग्राम विकास व पंचायत राज विभाग

## राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण



# महा आवास

### त्रैमासिक

@MAHAAWAAS www.mahaawaas.org

जुलै ते सप्टेंबर २०२३



मा.मुख्यमंत्री श्री.एकनाथ शिंदे यांचे शुभहस्ते मा.उप मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस व मा.उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार यांच्या प्रमुख उपस्थित शासन आपल्या दारी कार्यक्रमात घरकुल लाभार्थी सन्मानीत



मा.उप मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांच्या शुभहस्ते नागपूर येथे जिल्हास्तरीय महा आवास अभियान पुरस्कार वितरण



मा.केंद्रीय आरोग्य मंत्री, श्रीमती.भारती पवार व मा.मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज श्री.गिरीष महाजन यांच्या शुभहस्ते नाशिक येथे जिल्हास्तरीय महा आवास अभियान पुरस्कार वितरण



मा.मंत्री, कृषी व माजी सैनिक कल्याण यांच्या शुभहस्ते पालघर येथे जिल्हास्तरीय महा आवास अभियान पुरस्कार वितरण

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# ग्राम विकास विभाग

## संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष – ग्रामीण गृहनिर्माण यांचे कार्यालय

## महा आवास


| | |
|---|---|
| मार्गदर्शक | श्री. एकनाथ डवले, भा.प्र.से.<br>प्रधान सचिव,<br>ग्राम विकास व पंचायत राज विभाग |
| मुख्य संपादक | डॉ. राजाराम दिघे,<br>संचालक,<br>राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण |
| प्रबंध संपादक | नीलेश काळे, उप संचालक<br>राजलक्ष्मी येरपुडे, उप संचालक<br>अपर्णा पाटणे, सहा. संचालक (लेखा) |
| कार्यकारी संपादक | दिनेश मोवळे,<br>राज्य माहिती, शिक्षण व संवाद तज्ञ |
| सहयोगी संपादक | डॉ. संघरत्न सोनवणे<br>राम आघाव<br>परमेश्वर शेलार<br>सचिन मुनेश्वर<br>माधुरी चौधरी |
| मुख्यपृष्ठ मांडणी व सजावट | दिनेश मोवळे,<br>राज्य माहिती, शिक्षण व संवाद तज्ञ |
| संपादकीय पत्ता | संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण यांचे कार्यालय<br>४ था मजला, दक्षिण कक्ष, सिडको भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई - ४००६१४ |
| संकेत स्थळ | www.pmayg.nic.in<br>www.mahaawaas.org |
| ईमेल | directoriayruralhousing@gmail.com |
| दूरध्वनी क्रमांक | ०२२ - २७५६१८२४ |

वर्ष ४ थे । अंक १३ वा । जुलै ते सप्टेंबर २०२३


## अनुक्रमणिका


| अ.क्र. | तपशिल | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | संपादकीय | १ |
| २ | मा.संचालक यांना गुणवंत अधिकारी पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल गुण गौरव | ३ |
| ३ | अमृत महा आवास अभियान पुरस्कार २०२२-२३ | ५ |
| ४ | विविध उपक्रमांचा मागोवा<br>क्षमता बांधणी उपक्रम | ८ |
| | संनियंत्रण व मूल्यमापन उपक्रम | १२ |
| | माहिती, शिक्षण व संवाद उपक्रम | १६ |
| | समन्वय उपक्रम | १८ |
| | केंद्र व राज्य सरकार यांना ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रासंबंधित पॉलिसी इनपुट | २२ |
| ५ | ग्रामीण गृहनिर्माण योजनांचा संचित प्रगती अहवाल<br>प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण | २३ |
| | रमाई आवास योजना | २४ |
| | शबरी आवास योजना | २५ |
| | पारधी आवास योजना | २६ |
| | आदिम आवास योजना | २७ |
| | यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना | २७ |
| ६ | ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रातील नाविन्यपूर्ण उपक्रम/ यशोगाथा | २८ |
| ७ | फोटो गॅलरी | ३४ |
| ८ | मिडिया कवरेज | ३५ |


महा आवास हेल्पलाईन क्रमांक - १८०० २२ ०१९



**डॉ. राजाराम दिघे**
**संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष - ग्रामीण गृहनिर्माण**

महा आवास त्रैमासिकाच्या माध्यमातून आपणाशी संवाद साधताना मला अत्यंत आनंद होत आहे. प्रत्येक तीन महिन्यात या माध्यमातून संवाद साधत असतो माहे जुलै ते सप्टेंबर २०२३ या कालावधीमध्ये ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रात राज्याच्या विविध स्तरावर घडत असलेल्या घडामोडींचा धांडोळा घेण्याबरोबरच केंद्र व राज्य सरकारच्या धोरणांविषयीचाही उहापोह या निमित्ताने करणे आवश्यक वाटते.

ग्रामीण आवास योजना केंद्र व राज्य शासनाचा महत्वाकांक्षी प्रकल्प असल्यामुळे याच्या मध्ये गतिमानता व गुणवत्ता आणण्यासाठी विविध प्रयत्न केंद्र व राज्य पातळीवर होताना दिसत आहेत. १३ फ्लॅगशीप प्रोग्राम मध्ये ग्रामीण आवास योजनांचा समावेश केल्यामुळे ग्रामीण गृहनिर्माण हा अग्रणी विषय बनला आहे.

याची प्रतीपुर्ती करण्यासाठी केंद्र शासनाच्या ग्रामविकास विभागाने पुढील प्रमाणे कृती कार्यक्रम देऊन या बाबींवर अधिक लक्ष केंद्रीत करण्याचे निर्देश दिले आहेत. मंजूरी दिलेली घरकुले माहे डिसेंबर २०२३ पुर्वी पुर्ण करणे, भूमिहीन लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करून देणे, लाभार्थ्यांना सर्व हप्त्यांचे वितरण करणे, घरकुल पुर्णत्वाचा कालावधी कमी करणे, हप्ते वितरणाचा प्रशासकीय कालावधी कमी करणे, प्रलंबीत घरकुले (Delayed Houses) तसेच ग्रामीण गवंडी प्रशिक्षण पुर्ण करून सर्व प्रशिक्षणार्थींचे असेसमेंट पुर्ण करणे, घरकुल लाभार्थ्यांना इतर योजनांशी कृतीसंगम घडवून आणणे या बाबींकडे गांभीर्याने लक्ष देण्याबाबत कळविले आहे. त्यामुळे प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण मधील २,०३,८९० घरकुलांच्या पुर्णत्वासाठी सुक्ष्मनियोजन करणे आवश्यक आहे. तसेच राज्य पुरस्कृत आवास योजनांमधील १,७९,९६३ व मोदी आवास घरकुल योजनांचे ३ लक्ष उद्दिष्ट पुर्तीचेही सुक्ष्म नियोजन करणे आवश्यक आहे.

घर छोटे असो वा मोठे, स्वतःचे हक्काचे घर सर्वांसाठी जिव्हाळ्याचे असते. यासाठी राज्यात ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या कामात गतिमानता व गुणवत्तावाढीसाठी दिनांक २० नोव्हेंबर, २०२२ ते ०५ जून, २०२३ या कालावधीत स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त **अमृत महा आवास अभियान २०२२-२३** राबविण्यात आले. या अभियानाचा शुभारंभ राज्याचे मा.मुख्यमंत्री, श्री.एकनाथ शिंदे यांचे शुभहस्ते मा. उप मुख्यमंत्री, श्री. देवेंद्र फडणवीस व मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, ॲड.राहुल नार्वेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत दिनांक २४ नोव्हेंबर, २०२२ रोजी संपन्न झाला. या अभियानाच्या माध्यमातून राज्यात जवळ जवळ ५ लाख गरिब, गरजू, भूमिहीन व बेघर लाभार्थ्यां**चे घरकुलांचे स्वप्न पूर्ण झाले** आहे, याचा **मला अत्यंत आनंद होत असून याकरीता मी सर्व** सहभागी सर्व भागधारकांचे अभिनंदन. या अभियानात आपण घरकुल पुर्णत्वाबरोबरच अनेक नाविन्यपुर्ण उपक्रम हाती घेऊन लाभार्थ्यांचे जीवनमान उंचावण्यास प्रयत्न केले आहेत.

देशातील प्रत्येक गरिब, गरजु, बेघर व भूमिहीन लाभार्थ्यांचे स्वतःचे पक्के घर असावे यासाठी राज्याचे मा.मुख्यमंत्री व मा.उपमुख्यमंत्री यांच्या संकल्पनेतून सन २०२३-२४ च्या अर्थसंकल्पीय भाषणामध्ये राज्यातील **इतर मागास व विशेष मागास प्रवर्गासाठी मोदी आवास घरकुल योजनेची** घोषणा केली आहे. या माध्यमातून राज्यात येत्या ३ वर्षात १० लाख घरकुले बांधण्यात येणार असून या वर्षी ३ लाख घरकुलाचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. सर्व समाज घटकांना सोबत घेऊन खऱ्या अर्थाने या योजनांमुळे सर्वांसाठी घरे या उद्देश्याची पुर्ती होणार आहे.

अमृत महाआवास अभियानाच्या फलश्रुतीविषयी याठिकाणी मला चर्चा करावी वाटते. अमृत महाआवास अभियानामध्ये ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रात विविध उपक्रम राबवून ग्रामीण गृहनिर्माण योजनांतर्गत गरजू, पात्र परंतु घरकुल बांधकामासाठी जागा उपलब्ध नसलेल्या लाभार्थ्यांना पंडीत दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना, शासकीय जागा विनामूल्य उपलब्ध करण्याची योजना, ग्रामीण भागातील अतिक्रमणे नियमानुकूल करण्याची योजना व इतर मार्ग – उदा. बक्षीसपत्र, भाडेपट्टा, इ. योजनांच्या माध्यमातून ३८७९९ भूमिहीन लाभार्थ्यांना घरकुल बांधकामासाठी जागेची उपलब्धता करून देण्यात आली आहे.

जागांची कमतरता व जागांच्या वाढत्या किमती यांचा विचार करून कमी जागेत जास्त लाभार्थी सामावण्यासाठी लाभार्थ्यांना मार्गदर्शन व प्रवृत्त करून राज्यात ७८६ बहुमजली इमारती, २६४ गृहसंकुले व १२ हाऊसिंग अपार्टमेंटची उभारणी केली आहे. त्याचप्रमाणे सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांमधील भूमिहीन लाभार्थ्यांना घरकुल बांधकामाकरीता जागा उपलब्ध करुन देण्यासाठी ग्रामपंचायत स्तरावर **विविध मार्गांनी उपलब्ध होणाऱ्या जागांची 'लॅण्ड बँक' तयार करण्याचे काम हाती घेण्यात आले असून आत्तापर्यंत ४७१९ 'लॅण्ड बँक' अभियान काळात** तयार झाल्या आहेत.

सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांमधील लाभार्थ्यांना घरकुल बांधकामाकरीता वाळू उपलब्ध करुन देण्यासाठी २९६८ **'सॅण्ड बँक' ची निर्मिती करण्यात आली आहे.** या

ठिकाणी शासन निर्णया नुसार ५ ब्रास वाळू मोफत उपलब्ध करून देण्यात येत आहे. तसेच **वाळूला पर्याय** म्हणून क्रश सॅण्ड, सिमेंट ब्लॉक, फ्लाय ॲश ब्रिक्स, इंटर लॉकींग ब्रिक्स, हॉलो ब्रिक्स, इत्यादींचा वापर करण्यात येत आहे.

घरकुलांची गुणवत्ता सुधारण्यासाठी प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत ग्रामीण गवंडी प्रशिक्षण कार्यक्रमातून १२,१२० एवढे गवंडी प्रशिक्षण **पूर्ण करण्यात आले** असून प्रशिक्षित ग्रामीण गवंडी व ग्रामपंचायत क्षेत्रातील इतर उपलब्ध गवंडी यांची ग्रामपंचायतनिहाय यादी तयार करुन त्यांचे पॅनेल तयार करण्यात येत आहे. या **पॅनेलमधील गवंड्यांचा ग्रामीण गृहनिर्माण योजनांमधील घरकुलांच्या बांधकामात सहभाग घेण्यात येत आहे.**

विविध शासकीय योजनांशी कृतीसंगम करून लाभार्थ्यांना इतर शासकीय योजनांचा लाभ देवून जीवनमान उंचावण्यास मदत झाली आहे. यामध्ये एकूण पुर्ण घरकुलांपैकी मनरेगा मधून ९,०५,२३,६०० रोजगार(मनुष्य दिवस निर्मिती),स्वच्छ भारत मिशन (ग्रा) मधून २,८७,९१२ शौचालय, जल जीवन मिशन मधून २,९०,११७ नळ जोडणी, प्रधानमंत्री उज्वला योजने मधून २,८४,९०२ गॅस जोडणी, सौभाग्य योजने मधून ३,०१,४५० विद्युत जोडणी, महाराष्ट्र राज्य जीवनोन्नती मिशन मधून ४,५९,३५५ उपजिविकेचे साधन, इ. लाभ देण्यात आलेत.

दलित वस्ती सुधार योजना, ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधार योजना, जिल्हा परिषद सेस, पंचायत समिती सेस, ग्राम पंचायत सेस, सीएसआर निधी इ. च्या माध्यमातून **लाभार्थ्यांच्या घरकुलांना, बहुमजली इमारतींना, गृहसंकुलांना** रस्ते, पथदिवे, भूमिगत गटार, सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन, इ. मुलभूत नागरी सुविधा देवून आदर्श घरांची निर्मिती करण्यात आली आहे.

घरकुलांची गुणवत्ता सुधारण्यासाठी व लाभार्थ्यांना मार्गदर्शक ठरण्यासाठी प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत स्थानिक Geo-Climatic, Socio-Cultural Conditions व Locally Available Construction Materials चा विचार करुन तालुका स्तरावर पंचायत समिती आवारामध्ये ३४९ तालुकास्तरीय व ९ जिल्हास्तरीय डेमो हाऊसेसची उभारणी करण्यात आली आहे. या जिल्हा व तालुकास्तरीय डेमो हाऊसला घरकुल लाभार्थ्यांच्या प्रत्यक्ष भेटी होत असून डेमो हाऊसमध्ये माहिती कक्ष किंवा लाभार्थी / महिला स्वयं सहायता गट यांच्या उत्पादनांच्या विक्रीसाठी महिला स्वयंसहायता गट/ ग्रामसंघ/ प्रभाग संघ/ विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था/ शेतकरी उत्पादक कंपनी, इ. समुदाय आधारीत संस्थांच्या सहकार्यातून १६९ कॉप-शॉप (Coop-Shop) सुरु करण्यात आले आहेत. कॉप-शॉप ची बाजारपेठेत स्वतंत्र ओळख निर्माण व्हावी, याकरीता आपण कॉप-शॉप लोगोची निर्मिती केली आहे.

राज्यात महिला स्वयंसहायता गट/ ग्राम संघ/ प्रभाग संघ/ विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था/शेतकरी उत्पादक कंपनी, इ. समुदाय आधारीत संस्थाद्वारे ३४५ घरकुल मार्ट सुरु करुन त्याद्वारे घरकुलाचे बांधकाम साहित्य जसे – दगड, विटा, वाळू, सिमेंट, दारे, खिडक्या, छताचे साहित्य, इ. बांधकाम साहित्य लाभार्थ्यांना बाजार भावाप्रमाणे व नजिकच्याच्या ठिकाणी उपलब्ध करून दिल्यामुळे किमान कालावधीत जास्तीत जास्त घरकुले भौतिकदृष्टया पूर्ण होत आहेत. घरकुल मार्टची बाजारपेठ स्वतंत्र ओळख निर्माण व्हावी, याकरीता आपण घरकुल मार्ट लोगोची निर्मिती केली आहे.

ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रात नवनवीन तंत्रज्ञान विकसीत करणे व इतर आवश्यक मदतीसाठी मा.मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज यांच्या प्रमुख उपस्थितीत आय.आय.टी. मुंबई, रिलायन्स फाऊंडेशन, हुडको, अभियांत्रीकी महाविद्यालय, पुणे व रोटरी इंटरनॅशनल यांच्याशी भागीदारीची घोषणा करण्यात आली. राज्यात स्थानिक भौगोलिक परिस्थितीनुसार घरकुल डिझाईन करणे, कमी खर्चातील पण दर्जेदार अशा घरकुलाचे तंत्रज्ञान विकसीत करणे तसेच भुकंप, वादळ आदी नैसर्गिक आपत्तींचा सामना करु शकणाऱ्या घरकुलांची निर्मिती करणे यासाठी आयआयटी (मुंबई) यांची मदत घेतली जात आहे. त्याचप्रमाणे अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे यांच्या ३० अभियंत्यांचा इंटर्नशिपव्दारे ग्रामीण गृहनिर्माण कामात सहभाग घेण्यात आला आहे. तसेच रोटरी इंटरनॅशनल संस्था लाभार्थ्यांना ग्रामीण गृहनिर्माणच्या कामात अर्थसहाय्य देत आहे. यासोबतच मोठ्या गावांमध्ये बहुमजली ईमारती तसेच हाऊसिंग कॉलनी आदींमध्ये सीएसआरच्या माध्यमातून मुलभूत नागरी सुविधा देण्यासाठी सहकार्य मिळत आहे. घरकुलविषयक विविध योजनांची माहिती संबंधीत शासकीय यंत्रणेसह लाभार्थ्यांपर्यंत ऑडीओ, व्हीडीओ तसेच टेक्स्ट मेसेजद्वारा पोहोचविण्यासाठी रिलायन्स फाऊंडेशनचे सहकार्य आहे.

महा आवास अभियानात उत्कृष्ट काम करणारे व्यक्ती व संस्था यांना मा. मुख्यमंत्री महोदयांच्या शुभहस्ते व मा. उप मुख्यमंत्री तसेच मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांच्या प्रमुख उपस्थितीत येणाऱ्या दिनांक २० नोव्हेंबर, २०२३ रोजी राज्यस्तरीय महा आवास अभियान पुरस्कार देवून गौरविण्यात येत आहे. यावेळी अभियान कालावधीत उत्कृष्ट काम करणारे विभाग, जिल्हे, तालुके, क्लस्टर्स, ग्रामपंचायती, लाभार्थी यांना प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह देऊन लवकरच गौरविण्यात येईल.

या अकांमध्ये मागील अंकाप्रमाणे यशोगाथा, मुख्य कार्यकारी अधिकारी, स्थानिक अधिकारी, पदाधिकारी यांच्या बैठका, क्षेत्रीय भेटी, राज्यस्तरावरून राबविण्यात आलेल्या मोहिमा, सर्व योजनांचा संचित प्रगती अहवाल तसेच विभागनिहाय यशोगाथा यांचा समावेश करण्यात आला आहे. मागील अंकाप्रमाणे हा अंकही आपणास नक्कीच आवडेल या अपेक्षेसह व अनेक शुभेच्छांसह!

**डॉ. राजाराम दिघे**
**संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष - ग्रामीण गृहनिर्माण**

# महाराष्ट्र शासनाच्या ग्राम विकास विभागाचा गुणवंत अधिकारी पुरस्कार मा. संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, डॉ. राजाराम दिघे यांना जाहीर

ग्राम विकास विभागांतर्गत राज्य शासनाच्या अनेक योजना व प्रकल्प राबविले जातात. अशा काही योजना /प्रकल्प राबवितांना संबंधित अधिकारी तसेच कर्मचाऱ्यांचे प्रशासकीय तसेच तांत्रिक कौशल्य पणाला लागते. असे प्रकल्प पूर्ण करताना अधिकारी/ कर्मचाऱ्यांमध्ये विशेष वैयक्तिक कौशल्य व गुणवत्ता आढळून येते. अशा अधिकारी / कर्मचाऱ्यांचा गौरव करण्याची योजना शासनाने ग्रामविकास व जलसंधारण विभागाने सन २००५-०६ पासून सुरु केली आहे.



सन २०२०-२१ या वर्षाकरता ग्राम विकास विभागाकडून **राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाचे मा. संचालक, डॉ. राजाराम दिघे (महाराष्ट्र विकास सेवा गट-अ) यांची गुणवंत अधिकारी पुरस्कारासाठी अंतिम निवड** करण्यात आली असून प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. याकरीता राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांच्याकडून मा. संचालक, डॉ. राजाराम दिघे यांचे हार्दिक अभिनंदन!

मा. संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, डॉ. राजाराम दिघे यांनी सन १९९९ ते आजतागायत विविध पदावर काम केले. त्यांनी काम केलेल्या पदांचा सविस्तर तपशिल पुढील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | धारण केलेले पद | संवर्ग | कालावधी |
|---|---|---|---|
| १. | संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, महाराष्ट्र राज्य | अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी (निवडश्रेणी) | २९.०७.२०२० ते आजतागायत |
| २. | मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (अतिरिक्त कार्यभार) | अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी (निवडश्रेणी) | १५.०१.२०२१ ते ०१.०३.२०२१ व ०५.०६.२०२३ ते २२.०७.२०२३ |
| ३. | मुख्य कार्यकारी अधिकारी, ग्राम सामाजिक परिवर्तन फाऊंडेशन (अतिरिक्त कार्यभार) | अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी (निवडश्रेणी) | १६.०२.२०२१ ते आजतागायत |
| ४. | स्टेट नोडल अधिकारी, आझादी का अमृत महोत्सव (अतिरिक्त कार्यभार) | अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी (निवडश्रेणी) | १८.०८.२०२१ ते आजतागायत |
| ५. | अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, ग्राम विकास विभाग | अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी | १४.११.२०१९ ते २८.०७.२०२० |
| ६. | विशेष कार्य अधिकारी, मा.मंत्री, सहकार, पणन व वस्त्रोद्योग, महाराष्ट्र राज्य | अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी | ०१.१०.२०१६ ते १३.११.२०१९ |
| ७. | प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, नाशिक | अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी | १६.०९.२०१५ ते ३०.०९.२०१६ |
| ८. | संचालक, राजमाता जिजाऊ माता-बाल आरोग्य व पोषण मिशन, नवी मुंबई. | अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी | ०१.०८.२०११ ते ०७.०९.२०१५ |
| ९. | आदिवासी विकास तज्ञ, जलस्वराज्य प्रकल्प-१, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग | अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी | ०३.०७.२००७ ते ३०.०६.२०२१ |
| १०. | उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ICDS), जिल्हा परिषद, ठाणे | उप मुख्य कार्यकारी अधिकारी (गट-अ) | ०९.११.२००६ ते २१.०६.२००७ |
| ११. | गट विकास अधिकारी (उच्च श्रेणी), इंदापूर, जिल्हा पुणे | उप मुख्य कार्यकारी अधिकारी (गट-अ) | १५.०७.२००५ ते ३०.०८.२००६ |
| १२. | गट विकास अधिकारी (उच्च श्रेणी), मावळ, जिल्हा पुणे | उप मुख्य कार्यकारी अधिकारी (गट-अ) | १६.११.२००० ते ०५.०५.२००५ |
| १३. | परिविक्षाधीन उप मुख्य कार्यकारी अधिकारी (गट-अ), जिल्हा परिषद, पुणे | परिविक्षाधीन उप मुख्य कार्यकारी अधिकारी (गट-अ) | ०४.०५.१९९९ ते १५.११.२००० |

डॉ. राजाराम दिघे साहेबांनी त्यांच्या कारकिर्दीत अनेक वैशिष्टयेपूर्ण कामे केली आहेत. त्याबद्दल सांगायचे झाल्यास राज्यातील सहकारी पणन व्यवस्था अर्थात महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ, खरेदी-विक्री संघ, विविध सहकारी कार्यकारी संस्था यांच्या बळकटीकरणासाठी '**अटल महापणन विकास अभियान**' या अभियानाची जडण-घडण मध्ये त्यांची महत्वपूर्ण भूमिका होती. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या उत्पादनाला मध्यस्त/दलाल/अडते यांच्या तावडीतून सुटका करुन शेतमाल थेट शहरी ग्राहकांपर्यंत पोहचविण्यासाठी '**कॉप-शॉप**' ही संकल्पना राबविली. सहकारी संस्था, शेतकरी उत्पादक कंपन्या आणि महिला, स्वयंसहायता गटाच्या उत्पादनांना '**महाफार्म**' व्दारे बाजारपेठ उपलब्ध करुन देण्यासाठी पुढाकार घेतला. अटल अर्थसहाय्य योजने अंतर्गत शेतकऱ्यांना सहकारी संस्थामध्ये संघटीत करुन आणि त्यांच्या कृषी व्यवसायाला पाठिंबा देऊन शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्यासाठी '**जागर नव-सहकाराचा**' या मोहिमेची रचना केली. जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, नाशिक व्दारे राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांच्या अंमलबजावणीमध्ये गतीमानता आणली तसेच **महिला सक्षमीकरण अभियान** या संकल्पनेची रचना केली. नाशिक जिल्ह्यामध्ये विविध ग्रामीण गृहनिर्माण योजनेतील **२०,००० पेक्षा जास्त घरकुले एका वर्षात पूर्ण** केली. SHG प्रोडक्ट चे मार्केटिंग करण्यासाठी '**गोदाई**' या ब्रॅण्डची निर्मिती केली. राजमाता जिजाऊ माता-बाल आरोग्य व पोषण मिशन मध्ये कुपोषण मुक्त गाव अभियानाची आखणी, अंमलबजावणी व पर्यवेक्षण केले. **जल स्वराज्य प्रकल्पामध्ये आदिवासी घटक** उपक्रमांचे पर्यवेक्षण, प्रकल्पात कार्यरत अधिकारी/ कर्मचारी यांचेसाठी मानव संसाधन विकास कार्यक्रमाची अंमलबजावणी, तसेच राज्यांतर्गत आणि आंतरराज्य प्रशिक्षण उपक्रम राबविले. या प्रकल्पाला सन २०११ साठी **Global Peoples First Award हे प्रथम क्रमांकाचे पारितोषिक** प्राप्त झाले. '**महात्मा ज्योतिबा फुले जल भूमी संधारण अभियाना**' च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी पुणे जिल्ह्यातील मावळ आणि इंदापूर तालुक्यामध्ये समाजातील सर्व घटकांना एकत्रित करून लोकसहभागातून वनराई बंधारे, जलस्त्रोत्रांचे खोलीकरण व बळकटीकरण, विहीरींचे व बोअरवेलचे पुनर्भरण, इ. उपक्रम राबविले. या अभियानात **मावळ तालुक्याला** पुणे विभागात प्रथम क्रमांक व पुणे जिल्ह्यात **प्रथम क्रमांक रू. ५ लाखाचा पुरस्कार** प्राप्त झाला. **राजीव गांधी प्रशासकीय गतीमानता अभियानात** पंचायत समिती, **मावळ मॉडेल पंचायत समिती म्हणून विकसीत** केल्याने शासनाकडून

**जिल्हास्तरीय पुरस्कार रू. १०,०००/-** प्राप्त झाला.

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पदाचा पदभार असताना ग्रामीण भागातील महिलांचा सर्वांगिण विकास होऊन त्यांचे सक्षमीकरण व्हावे यासाठी राज्यात **महा समृध्दी महिला सक्षमीकरण अभियान** राबविण्याबाबत संकल्पना अंमलात आणली. ग्राम सामाजिक परिवर्तन फाऊंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून ग्रामीण महाराष्ट्रातील सामाजिक परिवर्तन हेतुने राज्यात मानव विकासाचे शाश्वत ध्येय साध्य करण्यासाठी कॉर्पोरेट कंपन्यांच्या सामाजिक दायित्व निधीच्या माध्यमातून **ग्राम सामाजिक परिवर्तन अभियान अर्थात मिशन महाग्राम** ची अंमलबजावणी सुरु केली. राज्यात कोरोना महामारी विरोधात लढा देण्यासाठी व कोरोनामुक्त गावासाठी राज्याचे मा. मुख्यमंत्री यांचा राज्यातील सर्व सरपंचांशी ऑनलाईन संवाद कार्यक्रमाचे नियोजन व उपाययोजना करणेबाबत संपूर्ण कार्यवाही केली. भारताच्या स्वातंत्र्यप्राप्तीस ७५ वर्ष पूर्ण होत असल्याचे औचित्य साधून केंद्र शासनाच्या वतीने देशभरात आझादी का अमृत महोत्सव अंतर्गत स्टेट नोडल अधिकारी म्हणून ग्राम विकास व पंचायत राज विभागामार्फत राज्यस्तर, विभागस्तर, जिल्हास्तर, तालुकास्तर व ग्रामस्तरावर विविध उपक्रम राबविले. महाराष्ट्र राज्याच्या ग्रामविकास व पंचायत राज विभागाने भारत सरकारच्या पंचायतराज मंत्रालयाच्या india@७५.nic.in या संकेतस्थळावर ४,०४,२८२ उपक्रमांचे आयोजन करुन **देशात प्रथम क्रमांकावर** येण्याचा मान मिळविला आहे.

या सोबतच त्यांना अटल महापणन पुरस्कार, Rajmata Jijau Best SHG Award, महात्मा ज्योतिबा फुले जल भूमी संधारण पुरस्कार, Rajiv Gandhi Good Governance Award, इ. पुरस्कार प्राप्त झाले. तसेच त्यांनी पाणी पथ, HRD in Jal Swarajya, इ. पुस्तके व Process Document of the Atal Mahapanan Vikas Abhiyan, Guidelines Booklet on the Atal Arthsahayya Yojana for Cooperatives, Booklet on Success Stories in the Atal Mahapanan Vikas Abhiyan, नाशिक जिल्हा महिला सक्षमीकरण अभियान पुस्तिका, Best Practices in Community Driven Malnutrition Elimination in the State, Tribal Success Stories in Jal Swarajya-1 Project of Drinking Water and Sanitation, महा आवास अभियान मार्गदर्शक पुस्तिका, महा आवास अभियान यशोगाथा, महा आवास अभियान गौरवगाथा, महा आवास अभियान पुस्तिका, महा आवास त्रैमासिक व संवाद मातांशी त्रैमासिक इ. पुस्तिकांचे प्रकाशन केले. तसेच Community Participation, Mother and Family Empowerment in health and nutrition of mothers and children Quarterly Magazine of the State Nutrition Mission, The World Bank aided Project of Jal Swarajya-1 on Drinking Water and Sanitation in Lokrajya, Ashwaththa & Sujal-Nirmal magazine of GoM, Rajiv Gandhi Prashaskiya Gatimanata Abhiyan & Mahatma Jotiba Phule Jalbhoomi Sandharan Abhiyan in Mawal taluka of Pune district in Yashmanthan magazine of Yashda, Paper presented on 'Development Policy and Tribes' in a National Seminar at Swami Ramanand Tirtha University, Nanded and the paper published in the national magazine, इ. लेख विविध प्रसार माध्यमाव्दारे प्रकाशित झाले. विविध विभागामध्ये कार्यरत असतांना डॉ.राजाराम दिघे साहेबांनी अनेक शासन निर्णयही ड्राफ्ट केले.

राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण या कार्यालयात दि. २९ जुलै, २०२० पासून संचालक या पदाचा पदभार स्विकारला. यावेळी देशात कोरोना महामारीचे संकट असल्यामुळे सर्व योजना ठप्प झाल्या होत्या. यामुळे राज्यात राबविण्यात येणाऱ्या केंद्र पुरस्कृत व राज्य पुरस्कृत विविध ग्रामीण गृह निर्माण योजनांच्या अंमलबजावणी मध्ये गतीमानतेचा अभाव आढळून येत होता. अशा वेळी 'महा आवास अभियान' ही संकल्पना अंमलात आणून दिनांक २० नोव्हेंबर, २०२० पासून अंमलबजावणी करण्यात आली. यामुळे राज्यात राबविण्यात येणाऱ्या विविध ग्रामीण गृहनिर्माण योजनांमध्ये गतीमानता व गुणवत्ता आली. या अभियानामध्ये विविध शासकीय योजनांचे कृती संगमाने ग्रामीण भागातील लाभार्थ्यांचे जीवनमान उंचावण्यात आले. तसेच नाविण्यपूर्ण उपक्रम जसे सॅण्ड बँक, लॅण्ड बँक, बहुमजली इमारती, गृहसंकुले, डेमो हाऊस, घरकुल मार्ट, कॉप-शॉप, मॉडेल हाऊस, कॉर्पोरेट संस्थांशी भागिदारी, इ. नाविण्यपूर्ण उपक्रम राबविण्यात आले.

डॉ. दिघे साहेबांनी या कार्यालयाचा पदभार स्विकारल्यावर सर्व रिक्त पदांवर तज्ञ व्यक्तींची नेमणूक करून मनुष्यबळच्या मानधन वाढीचा मोठा निर्णय त्यांनी घेतला. महा आवास अभियान कालावधीत उत्कृष्ट काम करणारे व्यक्ती किंवा संस्था यांना मा.मुख्यमंत्री यांच्या शुभहस्ते व मा.उप मुख्यमंत्री यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्हे देवून गौरविण्यात आले. शासकीय अधिकारी यांच्या सोबत कंत्राटी/बाह्ययंत्रणेच्या मनुष्यबळाचा गौरव डॉ. दिघे साहेबांमुळेच झाल्याने ते संपूर्ण ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रात लोकप्रिय झाले आहे. त्यांचे ग्राम विकास क्षेत्रातील कार्य जेवढे सांगावे तेवढे कमी आहे.

मा. संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, डॉ. राजाराम दिघे यांचे गुणवत्त अधिकारी पुरस्कारासाठी पुनश्च अभिनंदन व पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा!

# अमृत महा आवास अभियान पुरस्कार

"सर्वांसाठी घरे-२०२४" हे केंद्र शासनाचे महत्वाचे धोरण असून राज्य शासनाने देखील या धोरणाचा स्विकार केला आहे. या अनुषंगाने राज्यात राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाच्या माध्यमातून केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण तसेच राज्य पुरस्कृत रमाई आवास योजना, शबरी आवास योजना, पारधी आवास योजना, आदिम आवास योजना, अटल बांधकाम कामगार आवास योजना, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना अशा विविध ग्रामीण गृहनिर्माण योजना राबविण्यात येत असून त्यांना पूरक पंडीत दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना, अतिक्रमण नियमानुकूल करण्याची योजना अशा योजनाही राबविण्यात येत आहेत.

घरकुलांच्या कामाची प्रगती फक्त संख्यात्मक न राहता गुणात्मक राहावी, नावीन्यपूर्ण कल्पना अंमलात आणून लाभार्थ्यांना सर्व सुविधायुक्त असे घरकुले उपलब्ध करुन द्यावीत, तसेच नैसर्गिक आपत्तीस सक्षमपणे सामोरे जाणारे घरकुले बांधण्यासाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा असे शासनाचे ध्येय आहे.

" सर्वांसाठी घरे- २ ० २ ४ " या शासनाच्या धोरणांतर्गत विविध उपक्रम राबवून केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना- ग्रामीण व राज्य पुरस्कृत सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या कामास गतिमान करणे व गुणवत्ता आणणे हा या हेतूने भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षाचे औचित्य साधून महाराष्ट्र राज्यात दिनांक **२० नोव्हेंबर, २०२२ रोजीच्या राष्ट्रीय आवास दिना पासून ते दिनांक ०५ जून, २०२३ या कालावधीत "अमृत महा आवास अभियान २०२२-२३"** राबविण्यात आले.

या अभियानाचा राज्यस्तरीय शुभारंभ महाराष्ट्र राज्याचे मा. मुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे यांचे शुभहस्ते व मा. उप मुख्यमंत्री, श्री. देवेंद्र फडणवीस, मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा ॲड. राहुल नार्वेकर, मा. मंत्री ग्राम विकास व पंचायत राज श्री. गिरीष महाजन, मा.अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग श्री. राजेश कुमार व संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, डॉ. राजाराम दिघे यांच्या प्रमुख उपस्थितीत दिनांक २४ नोव्हेंबर, २०२३ रोजी यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबई येथे संपन्न झाला.

**" अमृत महा आवास अभियान २ ० २ २ - २ ३ "** राज्यस्तरीय शुभारंभ कार्यशाळेत **"महा आवास अभियान-ग्रामीण २०२०-२१"** या अभियान कालावधीत उत्कृष्ट काम करणाऱ्या संस्था व व्यक्ती यांना मा. मुख्यमंत्री श्री.एकनाथ शिंदे यांच्या शुभहस्ते व मा. उप मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत राज्यस्तरीय **"महा आवास अभियान पुरस्कार" व "महा आवास अभियान विशेष पुरस्कार " स्वरूप प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह देवून गौरविण्यात आले.**

**या प्रसंगी सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी (जिल्हा परिषद), प्रकल्प संचालक (जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा), बँक प्रतिनिधी, मिडीया प्रतिनिधी, महा आवास अभियान २०२०-२१ चे राज्यस्तरीय पुरस्कार विजेते, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयातील त्यासोबतच ग्राम विकास विभागातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.**

**"अमृत महा आवास अभियान २०२२-२३"** या अभियान कालावधीत विविध उपक्रम राबबून सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या कामात गतीमानता व गुणवत्ता आणण्यात आली. यामध्ये राज्यात ३३,६८० भूमिहीन लाभार्थ्यांना घरकुल बांधकामासाठी जागेची उपलब्धता करण्यात आली. त्याप्रमाणे जागेच्या वाढत्या किमती व जागेची कमतरता याकरीता १,१५२ बहुमजली इमारती, २७९ गृहसंकुले, १२ हाऊसिंग अपार्टमेंट व ८,९७२ लॅण्ड बँकची उभारणी करण्यात आली. केंद्र व राज्य पुरस्कृत ग्रामीण गृहनिर्माण योजनांतर्गत जिल्ह्यांना वितरीत करण्यात आलेल्या घरकुलांच्या उद्दिष्टांप्रमाणे २,६९,८५५ घरकुलांना मंजूरी देण्यात आली. मंजूर घरकुलांच्या ३,२५,२७८ लाभार्थ्यांना पहिला हप्ता वितरीत करण्यात आला. त्यासोबतच घरकुलाच्या प्रगतीनुसार सर्व हप्त्यांचे वितरण विनाविलंब करण्यात आले. तसेच गरजे प्रमाणे इच्छुक लाभार्थ्यांना वित्तीय संस्थांकडून गृह कर्ज






उपलब्धतेसाठी सहकार्य केले. सर्व मंजूर घरकुले भौतिकदृष्ट्या पूर्ण करण्यासाठी २०४ घरकुल मार्ट सुरू करण्यात आले. वाळूच्या उपलब्धतेसाठी ८६६ सॅण्ड बँकची निर्मिती केली. अशा प्रकारे अभियान कालावधीत ४,२२,२६६ घरकुले भौतिकदृष्ट्या पूर्ण करण्यात आली. ११,५७० प्रलंबित घरकुले पूर्ण करण्यात आली. प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत ३३,४०७ ग्रामीण गवंडी प्रशिक्षण पूर्ण करून २९,०६९ गवंड्यांचे मूल्यांकन करण्यात आले आहे. इंदिरा आवास योजने अंतर्गत २६,९४६ घरकुल लाभार्थ्यांना सिंगल पेज एन्ट्रीनुसार तात्काळ निधी वितरीत करून ५,०८४ घरकुले आर्थिकदृष्ट्या पूण करण्यात आली. सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या लाभार्थ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी शासनाच्या विविध योजनांशी कृतीसंगम करून घरकुलासह इतर शासकीय योजनांचाही लाभ देण्यात आला. यामध्ये महा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने मधून ,,०९,७९,३८२ मनुष्य दिवस रोजगार, स्वच्छ भारत मिशन ग्रामीण मधून ३,४४,११७ शौचालय, जल जीवन मिशन मधून २,९५,०६८ घरांना नळाने पिण्याचा पाण्याचा पुरवठा, प्रधानमंत्री उज्वला योजनेमधून ३,१५,१२४ गॅस जोडणी, सौभाग्य योजने मधून ३,३०,५०४ विद्युत जोडणी, राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती मिशन मधून ९६,१२२ उपजिवीकेचे साधन उपलब्ध व महाराष्ट्र उर्जा विकास अभिसरण (महाउर्जा) मधून ५,४९,६६८ उर्जेच्या बचतीची साधनं, इ. शासकीय योजनांचा लाभ कृतीसंगमातून घरकुल लाभार्थ्यांना देण्यात आला.

**"अमृत महा आवास अभियान २०२२-२३"** या अभियान कालावधीत विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात आले. यामध्ये वाळूला पर्याय वापरून ४०,३१८ घरकुलांची निर्मिती, नवीन तंत्रज्ञान वारून ५७,३२२ घरकुलांची निर्मिती, ७०.३८९ मॉडेल हाऊसेसची निर्मिती, २,७३,६८९ घरकुलांवर पत्नीचे नाव व ग्रामपंचायत मालमत्ता नोंदवहीत नोंद घेण्यात आली. अशा प्रकारे विविध उपक्रम राबवून राज्यात अभियानाचीयशस्वी अंमलबजावणी करण्यात आली.

**"अमृत महा आवास अभियान २०२२-२३"** च्या प्रभावी अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापनासाठी राज्य, विभाग, जिल्हा, तालुका व गाव स्तरावर पुढीलप्रमाणे समित्या कार्यरत होत्या. या अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापन समित्या राज्यस्तर, विभागस्तर, जिल्हास्तर, तालुकास्तर व गावपातळीवरुन क्षमता बांधणी कार्यशाळा, आढावा बैठका, क्षेत्रिय भेटी (Field Visits), Awaas Soft, MIS Formats, इ. द्वारे अभियानाचे संनियंत्रन व मूल्यमापन केले.

| पुरस्कार नामांकने | उत्कृष्ट कामासाठीच्या पुरस्कारांची नामांकने निवडण्यासाठी समित्या |
|---|---|
| राज्यस्तरीय पुरस्कारांची निवड | राज्यस्तरीय अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापन समिती |
| विभागस्तरीय पुरस्कारांची निवड | विभागस्तरीय अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापन समिती |
| जिल्हास्तरीय पुरस्कारांची निवड | जिल्हास्तरीय अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापन समिती |
| तालुकास्तरीय पुरस्कारांची निवड | तालुकास्तरीय अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापन समिती |
| ग्रामपंचायतस्तरीय पुरस्कारांची निवड | तालुकास्तरीय अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापन समिती |

दिनांक २० नोव्हेंबर २०२२ ते दिनांक ०५ जून २०२३ या अभियान कालावधीत राबविण्यात आलेल्या उपक्रमांचे मूल्यमापन करून या मूल्यमापनाच्या आधारे विभाग, जिल्हा, तालुका व ग्रामस्तरावर उत्कृष्ट कामासाठीच्या पुरस्कारांची नामांकने काढण्यात आली आहेत. **"अमृत महा आवास अभियान २०२२-२३"** मध्ये उत्कृष्ट काम करणाऱ्या संस्था व व्यक्तींना विभाग, जिल्हा, तालुका व ग्रामस्तरावर **"अमृत महा आवास अभियान पुरस्कार"** देऊन गौरविण्यात येत आहे. राज्यस्तरीय पुरस्कार वितरण मा.मुख्यमंत्री यांचे शुभहस्ते व मा. उप मुख्यमंत्री, मा. मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज यांच्या प्रमुख उपस्थितीत नियोजित आहे. राज्यस्तरीय पुरस्काराचे स्वरुप, पुरस्कार वितरण कार्यक्रमाचे वेळापत्रक इत्यादी बाबत स्वतंत्रपणे कळविण्यात येईल.

## ग्रामपंचायतस्तरीय 'अमृत महा आवास अभियान पुरस्कार' वितरण

तालुकास्तरीय अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापन समितीने ग्रामपंचायतस्तरीय **'अमृत महा आवास अभियान पुरस्कार'** निवडीसाठी दिनांक ०१ ते ०७ जुलै, २०२३ या कालावधीत अभियानात राबविण्यात आलेल्या उपक्रमांचे मूल्यमापन करून पुरस्काराची नामांकने दिनांक ११ जुलै, २०२३ पर्यंत अंतिम करण्यात आली.

ग्रामपंचायतस्तरीय पुरस्कार वितरणाचा कार्यक्रम ग्रामपंचायतस्तरावर दिनांक १५ जुलै, २०२३ पर्यंत संबंधित ग्रामपंचायतीचे मा. सरपंच यांचे शुभहस्ते करण्यात आला. याप्रसंगी ग्रामपंचायतस्तरीय पुरस्कार विजेत्यांना प्रशस्तीपत्र देवून गौरविण्यात आले.

ग्रामपंचायतस्तरावर पुढील प्रमाणे **'अमृत महा आवास अभियान पुरस्कार'** वितरीत करण्यात आले.

**I. प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण**

सर्वोत्कृष्ट घरकुल - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.

**II. राज्य पुरस्कृत आवास योजना**



## तालुकास्तरीय 'अमृत महा आवास अभियान पुरस्कार' वितरण

तालुकास्तरीय अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापन समितीने तालुकास्तरीय **'अमृत महा आवास अभियान पुरस्कार'** निवडीसाठी दिनांक १२ जुलै, २०२३ ते दिनांक २१ जुलै, २०२३ या कालावधीत अभियानात राबविण्यात आलेल्या उपक्रमांचे मूल्यमापन करून पुरस्काराची नामांकने दिनांक २२ जुलै, २०२३ रोजी पर्यंत अंतिम केली.

तालुकास्तरीय पुरस्कार वितरणाचा कार्यक्रम तालुकास्तरावर दिनांक ३१ जुलै, २०२३ पर्यंत संबंधित तालुक्याचे मा. आमदार यांचे शुभहस्ते करण्यात आला.

याप्रसंगी तालुकास्तरीय पुरस्कार विजेत्यांना प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह देवून गौरविण्यात आले.

तालुकास्तरावर पुढील प्रमाणे **'अमृत महा आवास अभियान पुरस्कार'** वितरीत करण्यात आले.

**I. प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण**

i. सर्वोत्कृष्ट क्लस्टर – प्रथम क्रमांक.
ii. सर्वोत्कृष्ट ग्रामपंचायत - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.
iii. सर्वोत्कृष्ट घरकुल - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.

**II. राज्य पुरस्कृत आवास योजना**

i. सर्वोत्कृष्ट क्लस्टर – प्रथम क्रमांक.
ii. सर्वोत्कृष्ट ग्रामपंचायत - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.
iii. सर्वोत्कृष्ट घरकुल - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.

## जिल्हास्तरीय 'अमृत महा आवास अभियान पुरस्कार' वितरण

जिल्हास्तरीय अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापन समितीने जिल्हास्तरीय **'अमृत महा आवास अभियान पुरस्कार'** निवडीसाठी दिनांक २३ जुलै ते ०१ ऑगस्ट, २०२३ या कालावधीत अभियानात राबविण्यात आलेल्या उपक्रमांचे मूल्यमापन करून पुरस्काराची नामांकने दिनांक ०२ ऑगस्ट, २०२३ रोजी पर्यंत अंतिम केली.

जिल्हास्तरीय पुरस्कार वितरणाचा कार्यक्रम भारतीय स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून जिल्हास्तरावर दिनांक १५ ऑगस्ट, २०२३ रोजी संबंधित जिल्ह्याचे मा.पालकमंत्री यांचे शुभहस्ते करण्यात आला. याप्रसंगी जिल्हास्तरीय पुरस्कार विजेत्यांना प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह देवून गौरविण्यात आले.

जिल्हास्तरावर पुढील प्रमाणे **'अमृत महा आवास अभियान पुरस्कार'** वितरीत करण्यात आले.

**I. प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण**

i. सर्वोत्कृष्ट तालुके - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.
ii. सर्वोत्कृष्ट क्लस्टर - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.
iii. सर्वोत्कृष्ट ग्रामपंचायत - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.

**II. राज्य पुरस्कृत आवास योजना**

i. सर्वोत्कृष्ट तालुके - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.
ii. सर्वोत्कृष्ट क्लस्टर - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.
iii. सर्वोत्कृष्ट ग्रामपंचायत - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.



## विभागस्तरीय 'अमृत महा आवास अभियान पुरस्कार' वितरण

विभागस्तरीय अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापन समितीने विभागस्तरीय **'अमृत महा आवास अभियान पुरस्कार'** निवडीसाठी दिनांक ०३ ते १२ ऑगस्ट, २०२३ या कालावधीत अभियानात राबविण्यात आलेल्या उपक्रमांचे मूल्यमापन करून पुरस्काराची नामांकने दिनांक २३ ऑगस्ट, २०२३ रोजी पर्यंत अंतिम केली.

विभागस्तरीय पुरस्कार वितरणाचा कार्यक्रम विभागस्तरावर दिनांक १६ ऑगस्ट, २०२३ रोजी संबंधित विभागाचे विभागीय आयुक्त यांचे शुभहस्ते करण्यात येत आहे. याप्रसंगी जिल्हास्तरीय पुरस्कार विजेत्यांना प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह देवून गौरविण्यात येत आहे.

विभागस्तरावर पुढील प्रमाणे **'अमृत महा आवास अभियान पुरस्कार'** वितरीत करण्यात आले.

**I. प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण**

i. सर्वोत्कृष्ट जिल्हे - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.
ii. सर्वोत्कृष्ट तालुके - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.
iii. सर्वोत्कृष्ट ग्रामपंचायत - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.
iv. शासकीय जागा उपलब्धता व वाळू उपलब्धता सर्वोत्कृष्ट कामगिरी करणारे तालुके - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.

**II. राज्य पुरस्कृत आवास योजना**

i. सर्वोत्कृष्ट जिल्हे - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.
ii. सर्वोत्कृष्ट तालुके - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.
iii. सर्वोत्कृष्ट ग्रामपंचायत - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.
iv. शासकीय जागा उपलब्धता व वाळू उपलब्धता सर्वोत्कृष्ट कामगिरी करणारे तालुके - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.



## शासन आपल्या दारी कार्यक्रमात ग्रामीण गृहनिर्माण लाभार्थी सन्मानीत

महाराष्ट्र राज्याचे मा.मुख्यमंत्री श्री.एकनाथ शिंदे यांच्या संकल्पनेतून आणि मा.उप मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस, मा.उप मुख्यमंत्री श्री. अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र शासनाकडून '**शासन आपल्या दारी**' ही मोहीम सुरू केलेली आहे. शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ समाजातील तळागाळातील सर्व लोकांना मिळावा, हा या मोहिमेचा मुख्य उद्देश आहे.

या अभियानाची सुरूवात दिनांक १४ मे २०२३ रोजी सातारा जिल्ह्यातील पाटण तालुका येथे करण्यात आली. राज्याच्या बहुतांश भागात राबविण्यात येत असलेल्या या उपक्रमाचा मुख्यमंत्र्यांच्या प्रमुख उपस्थितीत भव्य शुभारंभ कार्यक्रम संपन्न झाला. शासना योजनांचा यावेळी लाभार्थ्यांना लाभ मिळवून देण्यात आला.

शासना मार्फत राबविण्यात येणाऱ्या अनेक कल्याणकरी योजनांचा सर्वसामान्य नागरिकांना कोणत्याही अडथळ्याविना लाभ मिळावा. या उद्देशाने शासनातर्फे हाती घेण्यात आलेल्या '**शासन आपल्या दारी**' या उपक्रमाला नागरिकांचाही उत्तम प्रतिसाद मिळत आहे. या कार्यक्रमांमध्ये जनतेला संबोधित करताना मा.मुख्यमंत्री म्हणाले की, सरकारने गेल्या ११ महिन्यांत जनहिताचे अनेक निर्णय घेतले आहेत. तसेच '**शासन आपल्या दारी**' अभियानाचे काम मोठ्या प्रमाणावर राबविण्यात येत असून त्यासाठी सर्व यंत्रणा कार्यरत आहे. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी १६,००० कार्यक्रम दूतांची नियुक्ती करण्यात आली आहे. सचिवालयात जनकल्याण कक्ष सुरु करण्यात आला आहे. तसेच प्रत्येक जिल्ह्यांत,जिल्हा जनकल्याण कक्ष सुरु केले आहेत.

'**शासन आपल्या दारी**' या कार्यक्रमा प्रसंगी विविध योजनांच्या लाभार्थ्यांसह ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या लाभार्थ्यांनाही प्रातिनिधीक स्वरूपात घरकुलाची चावी देवून सन्मानीत करण्यात येते आहे. यामुळे इतर घरकुल लाभार्थ्यांना प्रोत्साहन मिळत आहे. या कार्यक्रमाकरीता मा.मुख्यमंत्री व मा.उप मुख्यमंत्री यांचेसमवेत मा.मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज श्री. गिरीष महाजन यांची उपस्थिती बहुतांश जिल्ह्यांमध्ये असून या कार्यक्रमात ते सक्रीय सहभागी आहे.



## राज्यातील ग्रामीण भागात स्वतःचे घर नाही, असे एकही कुटुंब भविष्यात राहणार नाही

### - मा.मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज, श्री.गिरीष महाजन

**दिनांक १५ ऑगस्ट, २०२३ रोजी** भारतीय स्वातंत्र्य दिनाचे औचित्य सा**धुन नाशिक जिल्हास्तरीय 'अमृत महा आवास अभियान पुरस्कार**' वितरण समारंभ मा.केंद्रीय आरोग्य मंत्री, भारत सरकार, श्रीमती भारती पवार यांच्या अध्यक्षतेखाली आणि मा.मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज, महाराष्ट्र राज्य श्री. गिरीष महाजन यांच्या शुभहस्ते व विभागीय आयुक्त नाशिक, डॉ.राधाकृष्ण गमे यांच्या प्रमुख उपस्थितीत विभागीय आयुक्त कार्यालय नाशिक येथे संपन्न झाला.

'**अमृत महा आवास अभियान २०२२-२३**' या अभियान कालावधी मध्ये ४,२२,२६६ घरकुल बांधकाम पूर्ण झाली असून ४,०४,४७९ घरकुल बांधकाम पुर्णत्वाच्या मार्गावर आहे. अशा एकुण ८ लाख कुटुंबांची सरासरी सदस्य संख्या लक्षात घेतली तर सुमारे ४० लाख लोकांना पावसाळ्यापूर्वी घरकुलाचे छत मिळाले आहे. सर्व यंत्रणेने एकजुटीने हे अभियान यशस्वी केले असून असे अभियान कदाचित देशात कुठेही राबविले नसेल, असे मा.मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज, श्री. गिरीष महाजन यांनी सांगितले.

सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी गरिबांच्या हक्काच्या घराचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी घेतलेला पुढाकार व लाभार्थ्यांनी घरकुल बांधकामासाठी घेतलेले स्वकष्ट यामुळेच इतक्या मोठ्या प्रमाणात घरकुलांचे बांधकाम पूर्ण केल्याने हे अभियान यशस्वी झाले, याचा मला व माझ्या विभागाला खुप आनंद असल्याचे मा. मंत्री महोदय म्हणाले.

आता चालू वर्षात प्रतिक्षा यादीतील लाभार्थ्यांनाही घरे देण्यात येतील. राज्यात ग्रामीण भागात स्वतःचे घर नाही असे एकही कुटुंब बाकी राहणार नाही, यासाठी यापुढे काम करण्यात येणार असल्याचे मा.मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज, श्री. गिरीष महाजन यांनी सांगितले.



# मा. प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठकीमध्ये सर्व अधिकाऱ्यांची ग्रामीण गृहनिर्माण योजनांबाबत क्षमता बांधणी



मा.प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग, श्री. एकनाथ डवले यांचे अध्यक्षतेखाली व संचालक, राज्यव्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, डॉ. राजाराम दिघे यांच्या प्रमुख उपस्थितीत दिनांक १३ सप्टेंबर, २०२३ रोजी सर्व विभागीय आयुक्त कार्यालयाचे उपायुक्त ( विकास), जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी व जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणांचे प्रकल्प संचालक यांची केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत सर्व आवास योजनांबाबत आढावा बैठक दूरदृष्य प्रणालीद्वारे संपन्न झाली.

या बैठकीमध्ये संचालक, ग्रामीण गृहनिर्माण, डॉ.राजाराम दिघे यांनी गृहनिर्माण योजनांच्या प्रगतीबाबत सादरीकरण केले. यामध्ये भूमिहिन लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करुन देणे, प्रलंबित घरकुले (Delayed house) पुर्ण करणे, याकरिता ग्रामीण गवंडी प्रशिक्षण घेणे व सर्व अपूर्ण घरे डिसेंबर, २०२३ अखेर पूर्ण करणे बाबत सांगितले.

मा. प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग यांनी राज्यात प्रधानमंत्री आवास योजना- ग्रामीण अंतर्गत उर्वरीत २ लाख अपूर्ण घरकुले पूर्णत्वाच्या विविध टप्प्यावर असून, त्यातील प्रलंबित घरकुलासहित सर्व अपूर्ण घरकुले माहे ऑगस्ट, २०२३ अखेर पूर्ण करावयाची होती, तथापि आता माहे डिसेंबर, २०२३ अखेर पूर्ण करणेच्या सूचना केंद्रिय ग्रामीण विकास मंत्रालयाने दिल्या असल्याने हे काम वेळेत पूर्ण करणेबाबत सुचित केले. यासाठी सदर घरकुलांचे टप्पानिहाय फोटो काढण्यासाठी, लाभार्थ्यांची अडवणूक होऊ नये व त्यांचे हफ्ते वेळेवर मिळण्यासाठी सरपंच, ग्रामसेवक, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता, अंगणवाडी सेविका, आशा वर्कर, ग्राम रोजगार सेवक, बचत गट (SHG) यांची मदत घेऊन अपूर्ण घरकुले विहीत वेळेत पूर्ण करावीत, अशा सूचना मा. प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग यांनी दिल्या.

यानंतर राज्य पुरस्कृत योजनांबाबत जिल्हा निहाय आढावा घेण्यात आला. यामध्ये ज्या जिल्हयांची घरकुलांची मंजूरी बाकी आहे, त्या सर्व जिल्हयांना तात्काळ मंजूरी देणेबाबत व राज्य योजनांमधील अपूर्ण घरकुले पूर्ण करण्याबाबत सूचना दिल्या. तसेच **"मोदी आवास घरकुल योजना"** अंतर्गत यावर्षाचे ३ लाख घरकुलाचे उद्दिष्ट लवकरच प्राप्त होईल, त्यावरही मंजूरी प्रक्रिया सत्वर करावी लागेल असे मा. प्रधान सचिवांनी सांगितले. तसेच अटल बांधकाम कामगार आवास योजनेमधील लाभार्थ्यांना तात्काळ मंजूरी देण्याबाबत मा.प्रधान सचिव, कामगार यांना पत्र देणेबाबत मा. प्रधान सचिव, ग्रामविकास व पंचायतराज विभाग यांनी संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष –ग्रामीण गृहनिर्माण यांना सूचित केले.

सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजना अंतर्गत घरकुल बांधकामात गतिमानता आणण्यासाठी व लाभार्थ्यांना कागद पत्रांची पुर्तता करण्यासाठी करायच्या उपाययोजना बाबत सर्व उपस्थितांची क्षमता बांधणी मा.प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग, श्री. एकनाथ डवले यांनी केली.

# ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रात अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे यांच्या विद्यार्थ्यांचा इंटर्नशिपच्या माध्यमातून सहभाग

केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवासयोजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या कामात गतिमानता व गुणवत्ता आणण्यासाठी राज्यात दिनांक २० नोव्हेंबर २०२२ ते ०५ जून २०२३ या कालावधीत 'अमृत महा आवास अभियान' राबविण्यात आले. या अभियानामध्ये समाजातील सर्व घटकांचा समावेश ज्यामध्ये कॉर्पोरेट संस्था, स्वयंसेवी संस्था, शैक्षणिक संस्था आणि लोकसहभाग घेण्यासाठी मा.मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज, श्री. गिरीष महाजन यांच्या प्रमुख उपस्थितीत रोटरी क्लब व अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे यांचेशी दिनांक ०४ फेब्रुवारी, २०२३ रोजी ऑर्चिड हॉटेल, पुणे येथे भागिदारीची घोषणा केली.

राज्यातील नामांकित शिक्षण संस्था अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे (C O E P ) यांचे समवेत ग्रामीण गृहनिर्माण योजनांतर्गत घरकुल बांधकामामध्ये गुणवत्ता आणण्याच्या दृष्टिकोनातून स्थापत्य अभियांत्रिकी व प्लॅनिंग विद्यार्थी यांचा इंटर्नशिपच्या माध्यमातून दिनांक २५ मे २०२३ ते २५ जुलै २०२३ या दोन महिन्याच्या कालावधी करीता एकूण ३० विद्यार्थांचा सहभाग घेण्यात आला. या विद्यार्थांनी ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रात नवनविन बांधकाम तंत्रज्ञान, पर्यावरण पूरक बांधकाम तंत्रज्ञान व आधुनिक तंत्रज्ञान, इ. बाबतीत क्षेत्रीय पातळीवर काम केले. याचा फायदा विद्यार्थी व ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रास झाला आहे.



# उत्कृष्टपणे काम करणाऱ्यांचा सत्कार, परंतु काम न करणाऱ्यांवर कठोर कारवाई

## - मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद औरंगाबाद श्री. विकास मीना

जिल्ह्यातील विविध योजनांच्या कामाचा आढावा घेण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद श्री. विकास मीना यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २६ जुलै, २०२३ रोजी फुलंब्री, वैजापूर, पैठण, दिनांक २७ जुलै, २०२३ रोजी औरंगाबाद, कन्नड, खुलताबाद व दिनांक २८ जुलै, २०२३ रोजी गंगापूर, सोयगाव, सिल्लोड, तालुक्यातील सर्व ग्रामसेवकांच्या आढावा बैठकी आयोजित करण्यात आल्या.

या बैठकांना जिल्हा परिषदचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुनील भोकरे, जल जीवन मिशनचे प्रकल्प संचालक श्री.राजेंद्र देसले, गंगापूर पंचायत समितीचे गट विकास अधिकारी श्री.संतोष वाघचौरे, सिल्लोड पंचायत समितीचे गट विकास अधिकारी श्री. डी. एस. अहिरे, सोयगाव पंचायत समितीचे गट विकास अधिकारी श्री. प्रकाश नाईक, कृषी अधिकारी श्री. अशोक भामरे, जिल्हा व तालुकास्तरीय सर्व विभाग प्रमुख, ग्रामीण गृह निर्माण अभियंता, सर्व विस्तार अधिकारी व संबंधित अधिकारी उपस्थित होते.

या बैठकांमध्ये इतर योजनांसह केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत सर्व योजनांचा मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विस्तृत आढावा घेतला. ग्रामसेवकांनी निधी विकासात्मक कामावर खर्च करणे, खर्च ऑनलाइन करणे, वसुली करणे, गृहभेटी देणे, शासकीय योजनेची गावात जनजागृती करणे, नियमित ग्रामसभा, मासिक सभा घेण्याच्या सूचना दिल्या. तसेच उत्कृष्ट काम करणाऱ्या ग्रामसेवकाचे अभिनंदन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी केले. जिल्ह्यातील ५ टक्केच ग्रामसेवक निष्क्रिय आहेत त्यामुळे त्याचा परिणाम ग्रामस्तरावरील कामावर दिसून येत असून त्यांनी कामात सुधारणा करणे गरजेचे असल्याचे यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी स्पष्टपणे सांगितले.

याप्रसंगी मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. विकास मीना यांनी केंद्र व राज्य पुरस्कृत विविध योजना विषयी सविस्तर माहिती ग्रामसेवकांना दिली. तसेच यायोजनांतर्गत येणाऱ्या सर्व अडणींवर मार्ग काढण्यासाठी जिल्हा प्रशासन नेहमीच आपल्या सोबत आहे. परंतु या पुढे जे ग्रामसेवक उत्कृष्ट कामगिरी करतील त्यांचा सत्कार जिल्हा प्रशासनाकडून करू, मात्र जे ग्रामसेवक कामात दिरंगाई किंवा काम करणार नाही अशांवर कठोर कारवाई करणार असल्याचे सांगितले.



# नांदेडच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडून घरकुल लाभार्थ्यांना गृहभेटी

नांदेड जिल्ह्यातील घरकुल कामांची पहाणी व घरकुल लाभार्थ्यांना घरकुले जलद गतीने पूर्ण करण्याकरीता नांदेड जिल्हा परिषदच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती मिनल करनवाल यांनी दिनांक ०२ सप्टेंबर, २०२३ रोजी गावांना क्षेत्रीय भेटी देत घरकुल लाभार्थ्यांना गृहभेटी देवून त्यांची क्षमता बांधणी व घरकुल बांधकाम करण्यास प्रोत्साहीत केले.

यावेळी श्रीमती मिनल करनवाल यांनी नांदेड तालुक्यातील ग्रामपंचायत लिंबगाव व ग्रामपंचायत तळणी येथील घरकुल बांधकाम, घरकुल मंजुरी लाभार्थी, प्रलंबित घरकुल लाभार्थी व भूमिहीन लाभार्थ्यांना गृहभेटी दिल्या. या भेटी दरम्यान त्यांनी घरकुल लाभार्थ्यांना घरकुल बांधकाम, मंजुर घरकुल बांधकाम सुरू करणे, घरकुल मार्ट सुरू करणे व प्रलंबित घरकुले तात्काळ पूर्ण करणे विषयी मार्गदर्शन केले. तसेच भूमिहीन लाभार्थ्यांना शासनाच्या विविध योजनांबाबत माहिती दिली.

मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती मिनल करनवाल यांनी घरकुल योजनांच्या कामासह अंगणवाडी, शाळा, घन कचरा व्यवस्थापन, जल जिवन मिशन व इतर योजनांच्या कामाचीही तपासणी केली.

यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या सोबत नांदेड पंचायत समितीचे गट विकास अधिकारी श्री.नारवटकर, विस्तार अधिकारी, ग्रामीण गृह निर्माण अभियंता व ग्रामसेवक उपस्थित होते. त्यांच्या क्षेत्रीय भेटी मुळे घरकुल लाभार्थी घरकुल बांधकामास सुरूवात करत असल्याचे श्री. नारवटकर यांनी सांगितले.



## ग्रामीण गृहनिर्माण योजनांतर्गत घरकुले पूर्ण करण्यासाठी पुणे जिल्ह्यात विशेष मोहीम

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा पुणे मार्फत केंद्र व राज्य पुरस्कृत सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांची अंमलबजावणी करण्यात येते. या योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक श्रीमती शालिनी कडू यांनी दिनांक २५ ऑगस्ट, २०२३ रोजी सर्व गट विकास अधिकारी यांची आढावा बैठक आयोजित केली.

या बैठकीमध्ये श्रीमती शालिनी कडू यांनी गावनिहाय घरकुल योजनांचा आढावा घेतला. तसेच यावेळी त्यांनी घरकुल बांधकामात उत्कृष्ट कामगिरी करणारे गट विकास अधिकारी व ग्रामसेवक यांचा सत्कार केला. तसेच घरकुलांचे बांधकाम जलद गतीने पूर्ण करण्यासाठी तालुका व ग्रामस्तरावर लाभार्थी मेळावे आयोजित करणे, घरकुल बांधकामास नियमित भेटी देणे, प्रलंबित घरकुले पूर्ण करणेसाठी लोक अदालतीचे आयोजन करणे, भूमिहीन लाभार्थ्यांना जागेची उपलब्धता करणे व वाळू उपलब्धतेसाठी सॅण्ड बँकची उभारणी करणे, इ. उपक्रम विशेष मोहीम राबवून पूर्ण करण्याच्या सूचना श्रीमती शालिनी कडून यांनी दिल्या.

त्यानुसार दिनांक ०९ सप्टेंबर, २०२३ रोजी जावली (मेढा), दौंड, भोर, सासवड, बारामती व इंदापूर तालुक्यांमध्ये प्रलंबित घरकुले पूर्ण करण्यासाठी लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले होते. या लोक अदालतीच्या माध्यमातून २९ घरकुल लाभार्थांना नोटीस बजावण्यात आली. जे लाभार्थी लोक अदालतीला अनुपस्थित होते अशांवर फौजदारी कार्यवाही प्रस्तावित करण्यात आली. यावेळी एका लाभार्थ्याने शासकीय अनुदानाचा परतावा केला. तर उर्वरीत लाभार्थ्यांनी घरकुल बांधकाम त्वरीत पूर्ण करत असल्याचे लेखी हमी पत्र दिले.

त्याचप्रमाणे दिनांक २६ सप्टेंबर, २०२३ रोजी पंचायत समिती खेड व ग्रामपंचायत वाडा तसेच दिनांक २७ सप्टेंबर, २०२३ रोजी ग्रामपंचायत वासुली येथे ग्रामसेवक यांचा लाभार्थीनिहाय आढावा घेण्यात आला. या बैठकीमध्ये शबरी आवास योजने अंतर्गत सर्व पात्र लाभार्थ्यांचे प्रस्ताव दिनांक २९ सप्टेंबर, २०२३ रोजी ११ वाजेपर्यंत पंचायत समिती कार्यालय खेड येथे सादर करण्याच्या सूचना खेड पंचायत समितीचे गट विकास अधिकारी श्री. शिंदे यांनी ग्रामसेवक यांना दिल्या.





## मिरज तालुक्यामध्ये लाभार्थी मेळाव्यांच्या माध्यमातून घरकुल लाभार्थ्यांना मार्गदर्शन

सांगली जिल्ह्यातील पंचायत समिती मिरजच्या गट विकास अधिकारी डॉ. संध्या जगताप यांनी विविध ग्रामीण आवास योजनांतर्गत घरकुले जलद गतीने पूर्ण करण्यासाठी ग्रामपंचायतनिहाय लाभार्थी मेळाव्यांचे आयोजन करून स्वतः उपस्थित राहून लाभार्थ्यांशी संवाद साधला व घरकुल बांधकामास प्रोत्साहीत केले.

यामध्ये दिनांक २८ सप्टेंबर, २०२३ रोजी ग्रामपंचायतीस सोनी येथे अपूर्ण घरकुल लाभार्थी मेळावा आयोजित करण्यात आला. यावेळी डॉ. संध्या जगताप यांनी प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व रमाई आवास योजना अंतर्गत अपूर्ण घरकुले त्वरीत पूर्ण करणे व लाभार्थ्यांकडून घरकुल पूर्ण करण्याचा कालावधी निश्चित करण्यात आला.

तसेच दिनांक २९ सप्टेंबर, २०२३ रोजी नांद्रे, मौजे डिग्रज, कसबे डिग्रज, कवलापूर, दुधगाव, तुंग, मालगाव, गुंडेवाडी या ग्रामपंचायतीनी अपूर्ण घरकुल लाभार्थी मेळावा आयोजित करून अपूर्ण घरकुल लाभार्थ्यांशी प्रत्यक्ष संवाद साधला व आवश्यक मार्गदर्शन केले.

या लाभार्थी मेळाव्याला पंचायत समितीचे संबंधित विस्तार अधिकारी, डेटा एन्ट्री ऑपरेटर, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता, ग्रामपंचायतीचे सरपंच, ग्रामसेवक, पदाधिकारी, घरकुल लाभार्थी व ग्रामस्थ उपस्थित होते. या लाभार्थी मेळाव्यामुळे घरकुल योजनांच्या कामात गतिमानता आली असल्याचे डॉ. संध्या जगताप यांनी सांगितले.




## ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या प्रभावी अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापनासाठी संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, डॉ. राजाराम दिघे यांच्या बैठका

राज्यात अमृत महा आवास अभियान २०२२-२३ अंतर्गत विविध उपक्रम राबवून ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या कामात आलेली गतिमानता व गुणवत्ता यामध्ये सातत्य कायम ठेवण्यासाठी संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, डॉ. राजाराम दिघे यांनी माहे जुलै ते सप्टेंबर २०२३ या कालावधीत अमरावती, नाशिक, नागपूर, औरंगाबाद, पुणे व कोकण विभागांच्या भागधारकांच्या व्हिडिओ कॉन्फरन्सिंग व्दारे नियमित बैठका घेवून घरकुल योजनांच्या कामांचा आढावा घेतला.

या बैठकांना विभागीय आयुक्त कार्यालयाचे उपायुक्त (विकास), सहाय्यक आयुक्त (विकास), जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक, सर्व पंचायत समितीचे गट विकास अधिकारी, विभागीय प्रोग्रामर, जिल्हास्तरीय प्रोग्रामर, डेटा एन्ट्री ऑपरेटर व संबंधित अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

या बैठकांमध्ये तालुक्यातील मनरेगा ऑपरेटर व घरकुल योजनेचा ऑपरेटर यांच्यामध्ये समन्वय ठेवून लाभार्थ्यांना घरकुलाचे हप्ते वेळेत वितरीत करणे, ग्रामसेवक/लाभार्थी/ग्रामीण गृहनिर्माण अभियंते यांच्या कडून प्रस्ताव/कागदपत्र वेळेत उपलब्ध करणे, घरकुलांना विनाविलंब मंजूरी देणे, भौतिकदृष्टया पुर्ण असलेली घरकुलांना शेवटचा हप्ता वितरीत करणे, भूमिहीन लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करून देणे, अपुर्ण घरकुले पूर्ण करणे, घरकुले आर्थिक व भौतिकदृष्ट्या विहित वेळेत पूर्ण होणेसाठी सातत्याने पाठपुरावा करणे, प्रलंबीत घरकुले (Delayed Houses) लोक अदालत किंवा इतर मार्गाने पूर्ण करणे, अपात्र लाभार्थ्यांची रिमांड प्रक्रिया पूर्ण करणे, विविध योजनांच्या कृतीसंगमाचा लाभ घरकुल लाभार्थ्यांना देणे, जागेचा वाद, करारनामा अप्राप्त, मयत लाभार्थी, अकाउंट व्हेरिफिकेशन, राज्य योजनेतील बदली प्रस्ताव याबाबत ग्रामपंचायतनिहाय संपर्क अधिकारी नेमून लाभार्थी निहाय पडताळणी करणे, इ. बाबतची कार्यवाही करण्याच्या सूचना संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, डॉ. राजाराम दिघे यांनी वेळोवेळी केल्या.

तसेच डेमो हाऊस मध्ये कॉप-शॉप सुरू करणे, घरकुल मार्ट सुरू करणे, सॅण्ड बँक उभारणी, लॅण्ड बँक उभारणी, मॉडेल हाऊसेसची निर्मिती यासह अमृत महा आवास अभियान पुरस्कार वितरण करणे व शासकीय जमीनीवरील निवासी अतिक्रमणे नियमित करणे अशा सूचना डॉ. राजाराम दिघे यांनी या बैठकांमध्ये केल्या.



## गृहसंकुल उभारणी मध्ये अहमदनगर जिल्ह्याची कामगिरी उल्लेखनिय

### - संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण,डॉ. राजाराम दिघे

राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाचे संचालक डॉ. राजाराम दिघे यांनी दिनांक १४ सप्टेंबर, २०२३ रोजी अहमदनगर जिल्ह्याचा दौरा केला. या दौरा कार्यक्रमा दरम्यान त्यांनी अहमदनगर तालुक्यातील ग्रामपंचायत नांदगाव येथे भेट देवून विविध ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या लाभार्थ्यांशी चर्चा केली. तसेच नांदगाव ग्रामपंचायती अंतर्गत उभारण्यात आलेल्या गृहसंकुलाची पहाणी केली.

यावेळी डॉ. राजाराम दिघे यांचे समवेत जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे सहाय्यक प्रकल्प अधिकारी श्री.साळवे उपस्थित होते. त्यासोबतच नांदगाव ग्रामपंचायतीचे सरपंच, उपसरपंच, सदस्य, ग्रामसेवक, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता, घरकुल लाभार्थी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अहमनगर जिल्ह्यात जवळ जवळ १२ गृहसंकुलाची उभारणी झाली असून गृहसंकुल बांधकाम गुणवत्ता पूर्ण आहे. गृहसंकुल उभारणीत अहमदनगर जिल्ह्याची संख्यात्मक व गुणात्मक कामगिरी उल्लेखनिय असल्याची प्रतिक्रीया यावेळी राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाचे संचालक डॉ. राजाराम दिघे यांनी व्यक्त केली. यासारख्या गृहसंकुलाची उभारणी राज्यातील इतरही जिल्ह्यात केल्यास भूमिहीन लाभार्थ्यांच्या जागेचा व पक्क्या दर्जेदार घरकुलाचा प्रश्न कायमाचा मार्ग लागेल असेही डॉ. राजाराम दिघे म्हणाले.




# प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीणच्या उद्दिष्टपूर्तीसाठी केंद्र सरकारच्या बैठका

ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांनी केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीणच्या प्रभावी अंमलबजावणी, संनियंत्रण, मूल्यमापन व उद्दिष्टपूर्तीसाठी माहे जुलै ते सप्टेंबर २०२३ या कालावधीत केंद्रीय अधिकारी यांचे मार्फत सर्व राज्यांच्या नियमित बैठका घेण्यात आल्या. या बैठकांना महाराष्ट्र राज्यातून संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, डॉ. राजाराम दिघे उपस्थित होते.

या बैठकांमध्ये राज्यास प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत देण्यात आलेल्या उद्दिष्टपूर्तीचा आढावा घेण्यात आला. तसेच उद्दिष्टपूर्तीसाठी राज्याने केलेल्या उपाययोजना व सद्यास्थितीत सुरू असलेल्या कार्यवाही बाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. त्याचप्रमाणे उर्वरीत उद्दिष्टपूर्तीचे नियोजन राज्याकडून घेण्यात आले. आवास सॉफ्ट प्रणाली मधील बदलांबाबत केंद्रिय अधिकारी यांचेकडून मार्गदर्शन करण्यात आले.

महाराष्ट्र राज्याचे उद्दिष्टपूर्तीसाठी गेल्या तीन वर्षापासून राज्यात महा आवास अभियान-ग्रामीण राबविण्यात येत असून प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत अपुर्ण घरकुले पूर्ण करणेसाठी विभागनिहाय विशेष मोहिम राबविण्यात आली. यामुळे राज्यात ग्रामीण गृहनिर्माण योजनांमध्ये अधिक गतिमानता व गुणवत्ता आली असल्याचे संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, डॉ. राजाराम दिघे यांनी सांगितले.

भुमिहीन लाभार्थ्यांना घरकुल बांधकामासाठी जागेच्या उपलब्धतेसाठी राज्यात टास्क फोर्स समितीची स्थापना, ग्रामस्तरावर उपलब्ध जागेतून लॅण्ड बँकची निर्मिती, बहुमजली इमारती, हाऊसिंग अपार्टमेंट व गृहसंकुलाची उभारणी करण्यात येत असून यामुळे भुमिहीन लाभार्थ्यांचे घराचे स्वप्न पूर्ण होत असल्याचे डॉ. राजाराम दिघे यांनी सांगितले.




| S. No. | State/UT | Target | Sanctioned | Completed |
|---|---|---|---|---|
| 1 | Madhya Pradesh | 37,89,400 | 37,42,051 | 28,82,448 |
| 2 | Assam | 20,84,070 | 13,32,961 | 6,70,827 |
| 3 | Bihar | 38,83,611 | 36,90,101 | 31,90,708 |
| 4 | Maharashtra | 15,05,983 | 12,77,879 | 9,18,084 |
| 5 | Tamil Nadu | 8,17,439 | 7,57,913 | 4,19,088 |
| 6 | Rajasthan | 17,33,959 | 17,26,806 | 15,08,721 |
| 7 | Jharkhand | 16,03,268 | 15,83,322 | 13,83,429 |
| 8 | Odisha | 26,95,837 | 18,38,032 | 17,08,383 |
| 9 | West Bengal | 34,82,359 | 34,68,511 | 33,76,515 |
| 10 | Jammu & Kashmir | 2,01,633 | 1,95,179 | 1,09,271 |
| 11 | Tripura | 2,82,238 | 2,37,097 | 1,81,120 |
| 12 | Gujarat | 4,49,167 | 4,33,114 | 3,92,098 |
| 13 | Uttar Pradesh | 26,15,951 | 26,10,540 | 25,92,504 |
| | Total | 2,51,44,915 | 2,28,93,506 | 1,93,33,196 |
| | All India Progress | 2,71,92,795 | [illegible],45,59,069 | 2,04,84,283 |

# प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत ग्रामीण घरकुल योजनांतर्गत अपूर्ण घरकुले जलद गतीने पूर्ण करण्यासाठी राज्यस्तरावरून विशेष मोहीम

केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांतर्गत अपूर्ण घरकुले जलद गतीने पूर्ण करण्यासाठी सचासक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण,डॉ. राजाराम दिघे यांच्या संकल्पनेतून दिनांक ३१ जुलै ते ०४ ऑगस्ट, २०२३ या कालावधीत राज्यस्तरीय संपर्क अधिकारी यांच्या मार्गदर्शानाखाली विशेष मोहिम राबविण्यात आली. या मोहिमेकरीता जिल्हा प्रोग्रॅमर मोहीमेच्या ठिकाणी उपस्थित होते.

औरंगाबाद विभागातील औरंगाबाद, हिंगोली, जालना, परभणी, लातूर, बीड, उस्मानाबाद व नांदेड या ८ जिल्ह्यांकरीता जिल्हा परिषद हिंगोली येथे राज्यस्तरीय संपर्क अधिकारी श्री. राम आघाव, राज्य समन्वयक (माहिती व तंत्रज्ञान) यांच्या मार्गदर्शाखाली मोहिम राबविण्यात आली. नागपूर विभागातील नागपूर, भंडारा, चंद्रपुर, गडचिरोली, गोंदिया, वर्धा व अमरावती विभागातील अमरावती, अकोला, वाशिम, यवतमाळ व बुलढाणा या ११ जिल्ह्यांकरीता जिल्हा परिषद, यवतमाळ येथे राज्यस्तरीय संपर्क अधिकारी श्रीमती अपर्णा पाटणे, सहाय्यक संचालक (लेखा) व डॉ. संघरत्न सोनवणे, राज्य समन्वयक (संनियंत्रण व मूल्यमापन) यांच्या मार्गदर्शनाखाली मोहीम राबविण्यात आली. नाशिक विभागातील नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगाव व अहमनगर या ५ जिल्ह्यांकरीता जिल्हा परिषद, नाशिक येथे राज्यस्तरीय संपर्क अधिकारी राज्य समन्वयक (माहिती प्रणाली) श्री. संघपाल चव्हाण व राज्य समन्वयक (माहिती






व तंत्रज्ञान) श्री. मायकल एल्डण यांच्या मार्गदर्शनाखाली मोहीम राबविण्यात आली. त्याचप्रमाणे पुणे विभागातील पुणे, सांगली, सोलापूर, सातारा, कोल्हापूर व कोंकण विभागातील ठाणे, पालघर, सिंधुदुर्ग, रत्नागिरी व रायगड या १० जिल्ह्यांकरीता राज्यस्तरीय संपर्क अधिकारी श्री.परमेश्वर शेलार यांच्या मार्गदर्शनाखाली राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालय, नवी मुंबई येथे मोहीम राबविण्यात आली.

या मोहिमे अंतर्गत जी घरकुले भौतिकदृष्ट्या पूर्ण आहेत, परंतु त्यांचे फोटो घेतले नाहीत, ते फोटो आवास सॉफ्ट प्रणालीवर अपलोड केलेले नाहीत व तालुकास्तरावरुन approve केलेले नाहीत, अशी घरकुले online पूर्ण करुन घेणे, Plinth व Lintel Level वरील घरकुलांना दुसरा व तिसरा हप्ता वितरीत करून घरकुल Physically पूर्ण करणे व प्रलंबीत घरकुले (Delayed Houses) पूर्ण करणे याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली.

या मोहीम कालावधीत ग्रामविकास अधिकारी/ ग्रामसेवक, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता, तालुकास्तरीय डेटा एन्ट्री ऑपरेटर व तालुकास्तरीय नोडल अधिकारी यांनी, त्यांना ठरवून दिलेल्या कार्यक्षेत्रात उपस्थित आवश्यक ती सर्व कार्यवाही पार पाडली.



## ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जिल्हा परिषद नांदेडच्या मुख्य कार्यकारी अधिकारी व अति.मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या क्षेत्रीय बैठका

नांदेड जिल्ह्यामध्ये ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जिल्हा परिषद नांदेडच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती मिनल करनाल व अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संदीप माळोदे यांनी तालुकास्तरावर क्षेत्रीय भेटी देवून बैठका सत्र सुरू केले आहे. त्यामुळे सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या कामात गतिमानत आल्याचे दिसून येते.

मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती मिनल करणवाल यांनी दिनांक ०८ ऑगस्ट, २०२३ रोजी पंचायत समिती बिलोली येथे तालुकास्तरीय आढावा बैठक घेतली. या बैठकीला जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक श्री.संजय तुबाकले, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (नरेगा) श्री.अमित राठोड, उप मुख्य कार्यकारी अधिकारी(पाणी व स्वच्छता) श्री.मिसाळ, श्री. भानुदास पेदेवाड , पंचायत समिती बिलोली गट विकास अधिकारी श्री. आर.डी. क्षीरसागर, विस्तार अधिकारी (पं ) श्री. जाधव,श्री. उडतेवार, डेटा ऑपरेटर श्री.पद्मभूषण जाधव पंचायत समिती अंतर्गत सर्व ग्रामसेवक/ग्रामविकस अधिकारी व इतर संबंधित अधिकारी उपस्थित होते.

या बैठकीमध्ये प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व रमाई आवास योजना अंतर्गत पहिला हप्ता देणे बाकी असलेल्या व पहिला हप्ता घेऊन अद्यापही काम सुरू न केलेल्या तसेच अपूर्ण घरकूले असलेल्या लाभार्थ्यांचा ग्रामपंचायत निहाय आढावा घेण्यात आला.

त्याचप्रमाणे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संदीप माळोदे यांनी विविध पंचायत समितीस्तरावर क्षेत्रीय भेटी देवून प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व रमाई आवास योजना अंतर्गत पहिला हप्ता देणे बाकी असलेल्या व पहिला हप्ता घेऊन अद्यापही काम सुरू न केलेल्या तसेच अपूर्ण घरकूले असलेल्या लाभार्थ्यांचा ग्रामपंचायत निहाय आढावा घेण्यात आला. लाभार्थीनिहाय आढावा घेऊन पहिला हप्ता तात्काळ वितरीत करणे व जलद गतीने घरकुल बांधकाम पूर्ण करण्याच्या सक्त सूचना दिल्या.

या बैठकांना पंचायत समितीचे गट विकास अधिकारी, विस्तार अधिकारी, ग्रामपंचायतीचे ग्रामविकास अधिकारी/ ग्रामसेवक, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता, डेटा एन्ट्री ऑपरेटर , संबंधित अधिकारी उपस्थित होते.





## घरकुलांच्या उद्दिष्टपूर्तीसाठी जत मध्ये गट विकास अधिकारी यांच्या क्षेत्रीय भेटी

सांगली जिल्ह्यातील जत पंचायत समितीचे गट विकास अधिकारी श्री.आप्पासो सरगर यांनी तालुकास्तरावर ग्रामसेवक व ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांचा सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या प्रगतीबाबत गावनिहाय आढावा घेतला. तसेच या बैठकीमध्ये घरकुलांचे उद्दिष्ट १०० टक्के पूर्ण करण्याच्या सूचना गट विकास अधिकारी यांनी उपस्थितांना दिल्या.

यावेळी ग्रामसेवक व ग्रामीण गृहनिर्माण अभियांता यांनी घरकुल लाभार्थी घरकुल बांधकाम सुरू करत नसल्याचे सांगितले. त्यानुसार घरकुलांच्या उद्दिष्टपूर्तीसाठी जत पंचायत समितीचे गट विकास अधिकारी श्री.आप्पासो सरगर यांनी गावांना क्षेत्रीय भेटी देवून लाभार्थ्यांनिहाय आढावा घेणे व लाभार्थ्यांना घरकुल बांधकामास प्रोत्साहीत करण्याचे नियोजन केले.

त्याप्रमाणे गटविकास अधिकारी यांनी माडग्याल व उमदी या ग्रामपंचायतींना क्षेत्रीय भेटी देवून गावातील सर्व घरकुल लाभार्थ्यांची बैठक घेतली. या बैठकीमध्ये श्री.आप्पासो सरगर यांनी घरकुल लाभार्थ्यांना घरकुल बांधकाम व विविध ग्रामीण गृहनिर्माण योजनांबाबत मार्गदर्शन केले.

तसेच गटविकास अधिकारी श्री.आप्पासो सरगर यांनी प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत अपूर्ण घरकुल लाभार्थ्यांच्या घरकुलांना भेटी दिल्या. यावेळी त्यांच्या समवेत विस्तार अधिकारी श्री. पवन खराबे, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता श्री. परिक्षित चव्हाण, ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक, सरपंच व लाभार्थी उपस्थित होते



## अपूर्ण घरकुले गतीने पूर्ण करण्याचे वैजापूर गट विकास अधिकारी यांचे निर्देश

औरंगाबाद जिल्ह्यातील वैजापूर तालुक्यात प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण तसेच शबरी आवास योजना व रमाई आवास योजने अंतर्गत अपूर्ण असलेल्या घरकुलांची कामे ९० दिवसांच्या आत पूर्ण करा असे निर्देश गटविकास अधिकारी श्रीमती पल्लवी लांडे यांनी दिले.

तालुक्यातील महालगाव येथे विविध घरकुल योजना अंतर्गत सुरू असलेल्या कामांची पाहणी श्रीमती पल्लवी लांडे यांनी केली. तसेच घरकुलाचे काम पूर्ण झालेल्या लाभार्थ्यांना फीत कापून गृहप्रवेश करण्यात आला. भानुदास इंगोले, सुखलाल बत्तीसे व अशोक झिंजुर्डे या लाभार्थ्यांचा अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत गृहप्रवेश झाला.

यावेळी नवीन मंजूर झालेल्या घरकुलाच्या कामाचे भूमिपूजन करण्यात आले. या कार्यक्रमाला सरपंच रोहिणी काळे, अभियंता राहुल आल्हाट, घरकुल कर्मचारी वैभव मतसागर, अमोल गलांडे, मच्छिंद्र आल्हाट, संपत जाधव, सतिष आल्हाट, प्रकाश हुमे, ग्रामपंचायत सदस्य सुरेश आल्हाट, कल्याण झिंजुर्डे, गणेश आहेर, मधुकर शेळके, नवनाथ गायकवाड, अंबादास जाधव, ग्रामविकास अधिकारी ईलियास शेख उपस्थित होते.



## गट विकास अधिकारी यांनी केले शाहुवाडी तालुक्यातील घरकुल लाभार्थ्यांना मार्गदर्शन

कोल्हापूर जिल्ह्यातील पंचायत समिती शाहूवाडी येथे गट विकास अधिकारी श्रीमती शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व रमाई आवास योजनेंतर्गत घरकुलांची कामे सुरू न करणाऱ्या लाभार्थ्यांची सभा घेऊन मार्गदर्शन करण्यात आले.

यासभेला सहाय्यक गट विकास अधिकारी श्री.माने, विस्तार अधिकारी सांख्यिकी श्री. कानडे,तालुका डेटा एन्ट्री ऑपरेटर श्री. राहुल कांबळे, कनिष्ठ सहाय्यक श्रीमती.क्षीरसागर, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता श्री. साईल संसारे, तालुक्यांतर्गत संबंधित ग्रामपंचायतीचे सरपंच, पदाधिकारी, ग्रामसेवक/ ग्रामविकास अधिकारी, लाभार्थी उपस्थित होते.



## मा. उप मुख्यमंत्री यांच्या शुभहस्ते अमृत महा आवास अभियान पुरस्कार वितरण

'**अमृत महा आवास अभियान २०२२-२३**' अंतर्गत दिनांक २० नोव्हेंबर, २०२२ ते ०५ जून, २०२३ या अभियान कालावधीत राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांचे मूल्यमापन करुन उत्कृष्ट काम करणाऱ्या संस्था व व्यक्तींना '**अमृत महा आवास अभियान पुरस्कार**' देऊन राज्य, विभाग, जिल्हा, तालुका व ग्रामस्तरावर गौरविण्यात येत आहे. जिल्हास्तरावर सबंधित जिल्ह्याचे पालकमंत्री यांच्या शुभहस्ते भारतीय स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून दिनांक १५ ऑगस्ट रोजी पुरस्कार वितरण करण्याचे शासन निर्णयात नमुद आहे.

त्यानुसार दिनांक १५ ऑगस्ट, २०२३ रोजी भारतीय स्वातंत्र्य दिनी नागपूर येथे जिल्हास्तरीय अमृत महा आवास अभियान पुरस्कार वितरण समारंभ मा. उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या शुभहस्ते संपन्न झाला. यावेळी पुरस्कारार्थींना मा. उप मुख्यमंत्री महोदयांच्या शुभहस्ते प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह देवून गौरविण्यात आले.



## शिराळा येथे तालुकास्तरीय अमृत महा आवास अभियान पुरस्कार वितरण सोहळा संपन्न

सर्वांसाठी घरे २०२४ हे केंद्र शासनाचे महत्वाचे धोरण असून त्या अनुषंगाने राज्य शासनाने देखील या धोरणाचा स्वीकार केलेला आहे. त्याकरिता केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत सर्व आवास योजनांच्या कामात गतिमानता व गुणवत्ता आणण्यासाठी राज्यात दिनांक २० नोव्हेंबर २०२२ ते दिनांक ०५ जून २०२३ या कालावधीत "**अमृत महा आवास अभियान २०२२-२३**" राबविण्यात आले.

या अभियान कालावधीमध्ये राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांचे मूल्यमापन करून उत्कृष्ट काम करणाऱ्या संस्था व व्यक्तींना अमृत महा आवास अभियान पुरस्कार देऊन गौरवण्याचा शासनाने निर्णय घेतलेला आहे. त्यानुषंगाने दिनांक १७ ऑगस्ट, २०२३ रोजी **तालुकास्तरीय अमृत महा आवास अभियान पुरस्कार वितरण** कार्यक्रम सांगली जिल्ह्यातील शिराळा तालुक्याचे मा.आमदार श्री.मानसिंगराव नाईक यांच्या शुभहस्ते पंचायत समिती शिराळा येथे संपन्न झाला.

यावेळी मा. आमदार महोदयांच्या शुभहस्ते सर्वोत्कृष्ट घरकुल, सर्वोत्कृष्ट ग्रामपंचायत व सर्वोत्कृष्ट क्लस्टर यांना पुरस्कार स्वरूप प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह देवून गौरविण्यात आले.

याप्रसंगी शिराळा पंचायत समितीचे गट विकास अधिकारी श्री. संतोष राऊत, सहाय्यक गट विकास अधिकारी श्री. अजिंक्य कुंभार, पदाधिकारी, पुरस्कारार्थी, पंचायत समितीचे सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



## मा. आमदार महोदयांच्या हस्ते ग्रामस्तरीय अमृत महा आवास अभियान पुरस्कार वितरण

राज्यात दिनांक २० नोव्हेंबर २०२२ ते दिनांक ०५ जून २०२३ या कालावधीत "**अमृत महा आवास अभियान २०२२-२३**" या अभियान कालावधीमध्ये राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांचे मूल्यमापन करून उत्कृष्ट काम करणाऱ्या संस्था व व्यक्तींना विविध स्तरावर अमृत महा आवास अभियान पुरस्कार देऊन गौरविण्यात येत आहे.

ग्रामस्तरीय अमृत महा आवास पुरस्कार ग्रामस्तरावर सरपंच यांच्या हस्ते वितरीत करणे अपेक्षित आहे. परंतु अमरावती जिल्ह्यातील नांदगाव खंडेश्वरचे मा.आमदार श्री. प्रतापदादा अडसड यांनी दिनांक २६ सप्टेंबर, २०२३ रोजी त्यांच्या मतदार संघातील ग्रामपंचायत दाभा येथे ग्रामस्तरीय अमृत महा आवास अभियान पुरस्कार वितरित करून पुरस्कारार्थी व घरकुल लाभार्थी यांना प्रोत्साहीत केले.



## घारफळ येथे मा.आमदार यांच्या हस्ते घरकुल गृहप्रवेश व लाभार्थी सन्मान

यवतमाळ जिल्ह्यातील बाभुळगाव तालुक्यामधील ग्रामपंचायत घारफळ येथे दिनांक ३० ऑगस्ट, २०२३ रोजी शासन आपल्या दारी या कार्यक्रमामध्ये बाबुळगावचे मा.आमदार डॉ. अशोकराव उईके यांच्या हस्ते घरकुल लाभार्थ्यांना ग्रामस्तरीय अमृत महा आवास अभियान पुरस्कार वितरण व विविध ग्रामीण गृहनिर्माण योजनांतर्गत पूर्ण झालेल्या घरकुलांचा गृहप्रवेश करण्यात आला.

यावेळी घारफळ येथे मा.आमदार डॉ.अशोकराव उईके यांचे हस्ते ग्रामस्तरीय अमृत महा आवास अभियान पुरस्कार विजेत्यांना प्रशस्तीपत्र देवून गौरविण्यात आले. तसेच घरकुले पूर्ण झालेल्या लाभार्थ्यांना प्रातिनिधीक स्वरूपात घरकुलाची चावी देवून व फित कापून गृहप्रवेश करण्यात आला.

या कार्यक्रमाला तालुकास्तरावरील सर्व अधिकारी, पदाधिकारी, ग्रामपंचायतीचे सरपंच, ग्रामसेवक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.






## भंडारा येथे जिल्हाधिकारी यांच्या हस्ते अमृत महा आवास अभियान पुरस्कार वितरण

केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत आवास योजनांच्या कामात गतिमानता व गुणवत्ता वाढीसाठी दिनांक २० नोव्हेंबर २०२२ ते दिनांक ०५ जून २०२३ या कालावधीत "अमृत महा आवास अभियान २०२२-२३" ची प्रभावी अंमलबाजवणी भंडारा जिल्ह्यात करण्यात आली. या अभियान कालावधीत विविध नावीन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात आले.

भंडारा जिल्ह्यात भारतीय स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून दिनांक १५ ऑगस्ट २०२३ रोजी जिल्हाधिकारी श्री. योगेश कुंभेजकर यांच्या हस्ते अभियान कालावधीत उत्कृष्ट काम करणाऱ्या संस्था व व्यक्तींना जिल्हास्तरीय अमृत महा आवास अभियान पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

याप्रसंगी प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत सर्वोत्कृष्ट तालुका प्रथम क्रमांक पंचायत समिती तुमसर, व्दितीय क्रमांक पंचायत समिती साकोली व तृतीय क्रमांक पंचायत समिती मोहाडी, सर्वोत्कृष्ट ग्रामपंचायत प्रथम क्रमांक ग्रामपंचायत बोरगाव, ता. मोहाडी, व्दितीय क्रमांक ग्रामपंचायत सिरसोली, ता. मोहाडी व तृतीय क्रमांक निलज बु., ता. मोहाडी व सर्वोत्कृष्ट क्लस्टर प्रथम क्रमांक श्री. मधुकर रोकडे, व्दितीय क्रमांक श्री. विशाल बारई, तृतीय क्रमांक श्री. इर्शाद शेख, इ. पुरस्कार वितरीत करण्यात आले.

त्याचप्रमाण राज्य पुरस्कृत आवास योजना ग्रामीण अंतर्गत सर्वोत्कृष्ट तालुका प्रथम क्रमांक पंचायत समिती साकोली, व्दितीय क्रमांक पंचायत समिती लाखांदुर व तृतीय क्रमांक पंचायत समिती भंडारा, सर्वोत्कृष्ट ग्रामपंचायत प्रथम क्रमांक ग्रामपंचायत पारडी व ग्रामपंचायत दहेगाव, ता. लाखांदुर, व्दितीय क्रमांक ग्रामपंचायत चिचाल, ता. लाखांदुर व तृतीय क्रमांक ग्रामपंचायत गर्राबघेडा, ता. तुमसर व सर्वोत्कृष्ट क्लस्टर प्रथम क्रमांक श्रीमती विन्सी सार्वे, व्दितीय क्रमांक श्रीमती जुही कातोरे, तृतीय क्रमांक श्री. सुरेद्र शहारे, इ. पुरस्कार वितरीत करण्यात आले.

या पुरस्कार वितरण समारंभाकरीता जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. समीर कुर्तकोटी, पोलिस अधिक्षक श्री. लोहीत मताणी, निवासी जिल्हाधिकारी श्रीमती लीना फलके, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. कमलाकर रणदिवे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक श्री. विवेक बोन्द्रे, भंडारा पंचायत समितीचे गट विकास अधिकारी, जिल्हा प्रोग्रामर श्री. आशिष चकोले, डेटा एन्ट्री ऑपरेटर श्री. प्रफुल मडामे, श्री. राजेश तांबुरकर, कनिष्ट लिपीक श्री. भाष्कर मेश्राम, जिल्हास्तरीय सर्व अधिकारी, पुरस्कारार्थी, पुरस्कार विजेत्या तालुका व ग्रामपंचायतीचे अधिकारी, पदाधिकारी व संबंधित अधिकारी उपस्थित होते.



## ग्रामीण विकास भारत सरकारच्या केंद्रिय अधिकाऱ्यांचा पालघर जिल्ह्यात दौरा

ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकारच्या मा.अतिरिक्त महासंचालक श्रीमती आशा पोळ आणि मा. संचालक श्री. यश पाल यांनी दिनांक ०१ जुलै, २०२३ रोजी पालघर जिल्ह्याचा दोरा केला.

या दौरा कार्यक्रमादरम्यान त्यांनी पालघर जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. रविंद्र शिंदे यांच्या उपस्थितीत पालघर जिल्ह्यात बैठक व गावांना क्षेत्रिय भेटी दिल्यात. यामध्ये पालघर जिल्ह्यातील गोवर्धन स्कील सेंटर, सासंद आदर्श ग्राम योजना अंतर्गत हमरापूर, गोऱ्हे व नावे या ग्रामपंचायतींना भेटी दिल्यात. तसेच वाडा तालुक्यातील ब्लँकेट बनविणारे स्वयंसहाय्यता बचत गटांना भेटी देवून ब्लँकेटची पहाणी केली.

त्याचप्रमाणे ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकारच्या मा.अतिरिक्त महासंचालक श्रीमती आशा पोळ आणि मा.संचालक श्री. यश पाल यांनी पालघर जिल्ह्यातील ग्रामपंचायतींना भेटी देवून केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत बांधकाम पूर्ण झालेल्या व बांधकाम प्रगतीत असलेल्या घरकुलांना भेटी देवून घरकुल लाभार्थ्यांशी संवाद साधला. तसेच ग्रामस्थ व लाभार्थ्यांना मार्गदर्शन केले.





## घरकुल बांधकाम सुरू न करणाऱ्या लाभार्थ्यांचे मा.आमदारांच्या हस्ते भूमिपूजन

केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत विविध ग्रामीण गृहनिर्माण योजनांतर्गत घरकुले पूर्ण करण्यासाठी सातारा जिल्ह्यात विविध उपाययोजना करण्यात येत आहे. याकरीता शासकीय यंत्रणेसह जिल्ह्यातील सर्व पदाधिकारी व लोकप्रतिनिधीं सक्रीय सहभागी झाले आहेत.

दिनांक १८ ऑगस्ट, २०२३ रोजी फलटण तालुक्यातील ग्रांमपंचायत तरडगाव येथे घरकुल बांधकाम सुरू न केलेल्या लाभार्थ्यांना घरकुल बांधकामासाठी प्रोत्साहीत करण्याकरीता फलटणचे मा.आमदार श्री.दीपक चव्हाण यांच्या हस्ते घरकुल बांधकाम सुरू न करणाऱ्या लाभार्थ्यांचे भुमिपूजन करण्यात आले. तसेच मा.आमदार महोदयांनी तात्काळ घरकुल बांधकाम सुरू करण्याचे लाभार्थ्यांना सांगितले.

याप्रसंगी सातारा जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक श्री.हराळे, फलटण पंचायत समितीचे गट विकास अधिकारी श्री. बोडरे, विस्तार अधिकारी श्री.कोंपले, ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक धायगुडे, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता, ग्रामपंचायत व तालुक्यातील अधिकारी, पदाधिकारी,घरकुल लाभार्थी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## सातारा जिल्ह्यात आदिवासी लाभार्थ्यांना घरकुल बांधकामासाठी जागेची उपलब्धता

सातारा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. ज्ञानेश्वर खिल्लारी व जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक श्री.संतोष हराळे याच्या मार्गदर्शनाखाली दिनांक ०८ सप्टेंबर, २०२३ रोजी पाटण तालुक्यातील धुमकवाडी मुरुड ग्रामपंचायती मधील ९ आदिवासी कातकरी लाभार्थ्यांना पंडित दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजने अंतर्गत ४.५ आर जागेचे खरेदीपत्र करण्यात आले.



54/2626
Friday,September 08 ,2023
4:40 PM

पावती

Original/Duplicate
Regn.:39M

पावती क्र.: 3279 दिनांक: 08/09/2023

₹. 600.00
₹. 340.00
₹. 940.00

5:00 PM

Sub Registrar Patan

₹.60000 /-
₹.60000/-
₹. 1000/-

1) eChallan ₹.600/-
MH007862227202324E 08/09/2023
2) DHC ₹.340/-
0923081412216 08/09/2023
1) Exemption to EWS purchaser purchasing residential unit in project approved under Pradhan Mantri Awas Yojana- Housing for All (Urban). : No.Mudrank-2015/1745/UOR.24/CR-573/M-1 Dated 31/3/2018 (EWS)

यामुळे या ९ आदिवासी कुटुंबांचे घरकुलाचे स्वप्न पूर्ण होणार असून याकामी पाटण तालुक्याचे गट विकास अधिकारी, विस्तार अधिकारी, धुमकवाडी ग्रामपंचायतीचे सरपंच, ग्रामसेवक श्री. महाडिक व ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांनी प्रयत्न केले.

## गट विकास अधिकारी यांच्या हस्ते सिल्लोड तालुक्यातील गावात भूमिपूजन व गृहप्रवेश

मराठवाडा मुक्ती संग्राम अमृत महोत्सवानिमित्त औरंगाबाद जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.विकासजी मीना यांच्या संकल्पनेतून व जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक श्री.अशोक शिरसे यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक १५ सप्टेंबर, २०२३ रोजी पंचायत समिती सिल्लोड अंतर्गत मंजूर घरकुलाचे भूमिपूजन व पूर्ण झालेल्या घरकुल लाभार्थ्यांचा गृहप्रवेश गट विकास अधिकारी श्री. दादाराव अहिरे यांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी घरकुलांचे महत्व व त्यासोबत इतर शासकीय योजनांच्या कृती संगमातून मिळणार लाभ, परिसर स्वच्छता, शौचालयाचा वापर, घरासमोर वृक्ष लागवड, घरातील सांडपाण्याची व्यवस्थापन, घरातील ओला कचरा व सुका कचरा संकलन याबाबत गट विकास अधिकारी श्री. दादाराव अहिरे यांनी मार्गदर्शन केले.

याप्रसंगी सिल्लोड पंचायत समितीचे विस्तार अधिकारी श्री. केवलसिंग पाटील, श्री.अनिल हासे, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता श्री. कृष्णा जाधव, श्री. महेश देवगिरीकर, श्री. केशवकांत बुलबुले, ग्रामपंचायतीचे सरपंच, ग्रामसेवक, ग्रामपंचायत सदस्य, लाभार्थी व ग्रामस्थ उपस्थित होते.





## सोलापुरातील ५६०० इतक्या या लाभार्थ्यांवर गुन्हा दाखल होण्याची शक्यता

सोलापूर जिल्ह्यात केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत विविध ग्रामीण गृहनिर्माण योजनांची अंमलबजावणी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा कार्यालयामार्फत होते. या सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सोलापूर जिल्हा परिषदचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रभारी प्रकल्प संचालक संदीप कोहिनकर यांनी जिल्ह्यातील घरकुल योजनेमध्ये पहिला हप्ता घेऊन घराचे बांधकाम सुरू न केलेल्या आणि दुसऱ्या हप्त्यासाठी अर्ज न केलेल्या सुमारे पाच हजार सहाशे हून अधिक लाभार्थ्यांवर गुन्हा दाखल करणार असल्याचे सांगितले.

अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रभारी प्रकल्प संचालक संदीप कोहिनकर यांनी या लाभार्थ्यांना इशारा देताना लवकरात लवकर घरकुल बांधकाम सुरू करण्याच्या सूचना केल्या आहेत यासह त्यांनी तालुका निहाय लाभार्थ्यांच्या आकडेवारीची माहिती दिली.



## नांदेड जिल्ह्यात प्रलंबित घरकुले पूर्ण करण्यासाठी लोक अदालतीचे आयोजन

नांदेड जिल्ह्यात विविध ग्रामीण गृहनिर्माण योजनांतर्गत पहिला हप्ता घेवून घरकुल बांधकाम सुरू न करणारे तसेच दुसरा हप्ता घेवून घरकुलांचे बांधकाम पूर्ण न करणारे लाभार्थी यांची घरकुले पूर्ण करण्यासाठी नांदेड जिल्ह्यातील सर्व तालुकास्तरावर लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले.

यामध्ये दिनांक ०९ सप्टेंबर, २०२३ रोजी तालुका विधी सेवा समिती न्यायालय बिलोली व नांदेड यांच्या वतीने राष्ट्रीय लोक अदालत आयोजित करण्यात आली. या लोक अदालतीमध्ये ४९८ घरकुल लाभार्थ्यांना नोटीस एका घरकुल लाभार्थीकडून रू.१५,०००/- रक्कम वसुल करण्यात आली. लाभार्थ्यांकडून घरकूल पूर्ण करण्याची लेखी हमी घेण्यात आली. उमरी येथे प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व रमाई आवास योजना मधील पहिला हप्ता



घेऊन बांधकाम सुरू न केलेल्या ८४५ लाभार्थ्यांना तडजोडीसाठी बोलवण्यात आले. यावेळी यासर्व लाभार्थ्यांना दिपावलीच्या आत घरकुलाचे बांधकाम सुरू करण्याचे लेखी आदेश दिले.

त्याप्रमाणे हिमायतनगर, मुखेड, अर्धापुर, देगलुर, व भोकर येथे राष्ट्रीय लोक अदालत आयोजित करण्यात आली होती. या सर्व लोक अदालतीमध्ये पहिला घेऊन काम सुरू न केलेल्या व अपूर्ण वारंवार सुचना देवूनही एक वर्षापेक्षा जास्त कालावधीत होवूनही घरकुल बांधकाम न करणारे सर्व लाभार्थ्यांकडून घरकुल बांधकाम तात्काळ सुरू करणे कामी लेखी हमीपत्र घेण्यात आले. तसेच जे लाभार्थी अनुदान परत करण्यास तयार आहेत, अशा लाभार्थ्यांकडून रक्कमेची वसुली केली.

या लोक अदालतीमध्ये संबंधित पंचायत समितीचे गट विकास अधिकारी, विस्तार अधिकारी, तालुका डेटा एन्ट्री ऑपरेटर, ग्रामीण गृहनिर्माण अभियंते, घरकुल लाभार्थी व इतर संबंधित अधिकारी उपस्थित होते.



## ग्राम विकास व महसुल विभागाची समन्वयातून भिवापूर तालुक्यातील भूमिहीन लाभार्थ्यांना घरकुलासाठी जागेची उपलब्धता

नागपूर जिल्ह्यात केंद्र व राज्य पुरस्कृत विविध ग्रामीण गुहनिर्माण योजनांतर्गत गरिब, गरजू व बेघरांचे घरांचे स्वप्न पुर्ण करण्यासाठी सर्वोत्तोपरी प्रयत्न सुरू आहे. नागपूर जिल्ह्यात भूमिहीन लाभार्थ्यांना जागेची उपलब्धता करण्याकरीता ग्राम विकास व महसूल विभाग समन्वयाने काम करीत आहेत. याकरीता घरकुल लाभार्थ्यांना पंडित दीनदयाळ उपाध्याय जागा खरेदी अर्थसहाय्य योजना, अतिक्रमण नियमानुकूल करण्याची योजना, शासकीय जागा व बक्षीसपत्र, समत्तीपत्र, इतर मार्गाने घरकुल बांधकामाकरीता लाभार्थ्यांना जागेची उपलब्धता होत आहे.

पंचायत समिती भिवापूर येथे घरकुल लाभार्थ्यांना अतिक्रमण नियमानुकूल करून घरकुल बांधकामासाठी जागा उपलब्ध करून देण्यासाठी दिनांक ०४ ऑगस्ट, २०२३ रोजी तहसीलदार व गट विकास अधिकारी यांनी समन्वय बैठक घेतली.

या बैठकीला भिवापूरचे तहसिलदार यांच्यासह पंचायत समितीचे गट विकास अधिकारी डॉ. चेतन जाधव, सहाय्यक गट विकास अधिकारी श्री. विजय जिडगीलवार, विस्तार अधिकारी श्री. ठाकरे, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता, संबंधित ग्रामपंचायतींचे ग्रामसेवक, पंचायत समितीचे संबंधित अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



## नांदेड येथे उपजिल्हाधिकारी यांचेकडून घरकुल लाभार्थ्यांचा सत्कार

नांदेड येथे मराठवाडा मुक्ती संग्राम ७५ व्या अमृत महोत्सवा निमित्त प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व रमाई आवास योजने अंतर्गत उत्कृष्ट घरकुल बांधकाम करणाऱ्या लाभार्थ्यांना दिनांक १७ सप्टेंबर, २०२३ रोजी नांदेडचे उपजिल्हाधिकारी श्री.कुलदीप जंगम यांच्या हस्ते प्रमाणपत्र देवून सन्मानीत करण्यात आले.

या कार्यक्रमाला नांदेडचे तहसीलदार श्री.राजाभाऊ कदम, पंचायत समिती देगलुरचे गट विकास अधिकारी श्री.शेखर देशमुख, पंचायत समिती अर्धापूरचे गट विकास अधिकारी श्रीमती मिना रावताळे, विस्तार अधिकारी श्री.मुंडकर, शाखा अभियंता श्री.कादर, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता श्री.ज्ञानेश्वर इंगळे, श्री.वैभव भंडारे, संबंधित ग्रामपंचायतीचे सरपंच, ग्रामसेवक, पुरस्कारार्थी, घरकुल लाभार्थी, जिल्हा व तालुकास्तरावरील संबंधित अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.



## राज्यात ग्रामीण गवंडी प्रशिक्षणामुळे कुशल गवंडी व गुणवत्तापूर्ण घरकुलांची निर्मिती

**राज्यात** घरकुलांची गुणवत्ता सुधारण्यासाठी व कुशल गवंड्याची निर्मिती करण्यासाठी प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत ग्रामीण गवंडी प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे.

ग्रामीण गवंडी प्रशिक्षण ग्रामस्तरावर देण्याकरीता प्रशिक्षण देणाऱ्या संस्थाची नेमणूक करण्यात आली असून या संस्थाशी समन्वय ठेवून प्रशिक्षण पूर्ण करण्यात येत आहे. तसेच **त्यांचे मुल्यांकनही** (Assessment) **त्वरीत पूर्ण करुन घेणे** व सदर माहिती आवास सॉफ्टवर अद्ययावत होत आहे.

प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत प्रलंबित घरकुले (Deleayed Houses) प्राधान्याने पूर्ण करण्यासाठी ग्रामीण गवंडी प्रशिक्षणाचा उपयोग करून घरकुले पूर्ण करण्यात येत आहेत. तसेच प्रशिक्षित ग्रामीण गवंडी व ग्रामपंचायत क्षेत्रातील इतर उपलब्ध गवंडी यांची ग्रामपंचायतनिहाय यादी तयार करुन त्यांचे पॅनेल बनविण्याचे काम प्रगतीत आहे. या **पॅनेलमधील गवंड्यांचा ग्रामीण गृहनिर्माण योजनांमधील घरकुलांच्या बांधकामात सहभाग घेण्यात येणार आहे**.







## नांदेड जिल्ह्यात घरकुल बांधकाम सुरू न केलेल्या लाभार्थ्यांना गृहभेटी

दिनांक २४ ऑगस्ट, २०२३ रोजी नांदेड जिल्हा परिषदचे उपमुख्य कार्येकारी अधिकारी श्री. मुक्कावार यांनी अर्धापूर तालुक्यातील ग्रामपंचायत पाटणूर व चेनापुर येथे पहिला हफ्ता घेऊन अद्याप काम सुरू न केलेल्या. लाभार्थी यांच्या भेटी घेऊन काम सुरू करणेबाबत सुचित केले. तसेच ग्रामपंचायत पाटणूर येथील लाभार्थ्यांना mark out देण्यात आले. बांधकाम प्रगतीत असलेल्या घरकुलाना भेटी दिल्या.

यावेळी अर्धापूर पंचायत समिती गट विकास अधिकरी श्रीमती रावताळे, श्री.मुंडकर,शाखा अभियंता श्री.कादर, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता, ग्रामसेवक, सरपंच, रोजगरसेवक, लाभार्थी व ग्रामस्थ उपस्थित होते.

त्याचप्रमाणे दिनांक २४ ऑगस्ट, २०२३ रोजी ग्रामपंचायत कामळज तालुका मुदखेड येथे पहिला हफ्ता घेऊन अद्याप काम सुरू न केलेल्या लाभार्थ्यांना गृहभेटी देवून दोन दिवसात काम सुरू करण्याचे सुचित केले. याकामी आवश्यक सहकार्य देणार असल्याची हमी दिली.

यावेळी कामळज ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक श्री.एस. पी. कदम, श्री. चक्रधर खांसोळे, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता श्री. हनुमान ठोके व रोजगरसेवक श्री.भायसर खानसोळे, लाभार्थी इ. उपस्थित होते.

तसेच दिनांक ३१ ऑगस्ट, २०२३ रोजी पंचायत समिती देगलुर अंर्तगत ग्रामपंचायत शहापूर येथील प्रधान मंत्री आवास योजना-ग्रामीण व रमाई आवास योजनेतील लाभार्थ्यांना गृहभेटी देवून मार्गदर्शन करण्यात आले. घरकुलांचे अनुदान घेवून घेऊन अद्याप काम सुरु न करणारे व अपुर्ण घरकुले आहेत अशा लाभार्थ्यांना सात दिवसाच्या आत काम सुरु करुन घरकुले लवकरात लवकर पुर्ण करण्याच्या सुचना देण्यात आल्या.

यावेळी पंचायत समिती देगलुर गट विकास अधिकारी श्री. देशमुख, ग्रामपंचायतीचे ग्रामविकास अधिकारी श्री.कोटागिरे, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता श्री. तोफवाले, श्री.शेख, श्री.वनंजे, सरपंच, उपसरपंच, लाभार्थी उपस्थित होते.





# मोदी आवास घरकुल योजना

- **विभाग** - इतर मागास बहुजन कल्याण विभाग
- **शासन निर्णय** - इतर मागास बहुजन कल्याण विभागा यांचेकडील दिनांक २८ जुलै, २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये इतर मागास प्रवर्ग व विशेष मागास प्रवर्गासाठी सदर घरकुल योजनेची प्रत्यक्ष अंमलबजावणी सुरु झाली.
- **उद्देश** - राज्यातील इतर मागास प्रवर्ग व विशेष मागास प्रवर्गासाठी घरकुल योजना
- वैशिष्ट्ये -
  - 100% राज्य पुरस्कृत योजना
  - दिनांक २८ जुलै, २०२३ रोजीच्या शासन निर्णया नुसार सन २०२३-२४, २०२४-२५ व २०२५-२६ या ३ वर्षामध्ये इतर मागास प्रवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील १० लाख पात्र लाभार्थ्यांसाठी घरकुले बांधावयाची आहेत.
  - घरकुलाचे २६९ चौ.फू.चटई क्षेत्रात स्वयंपाक घर व शौचालयासह बांधकाम अपेक्षित.
  - नवीन घर बांधण्यासाठी अथवा अस्तित्वात असलेल्या कच्च्या घराचे पक्क्या घरात रूपांतर करण्यासाठी साधारण क्षेत्रात रु. १.२० लक्ष व डोंगराळ/दुर्गमभाग क्षेत्रात लाभार्थ्यांना रु.१.३० लक्ष प्रति लाभार्थी अर्थसहाय्यअनुज्ञेय आहे.
  - उद्दिष्टाच्या किमान 5% घरकुले दिव्यांग लाभार्थ्यांसाठी राखीव.
  - AwaasSoft व PFMS प्रणालीद्वारे लाभार्थ्यांना निधी वितरीत करण्यात येतो.
  - आवास ॲप मार्फत घरकुल बांधकामाचे भौगोलीक परिक्षण(Geo-Tagging) करण्यात येते.
- लाभार्थी निवड -
  - इतर मागास बहुजन कल्याण विभागा यांचेकडील दिनांक २८ जुलै, २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये लाभार्थी निवड निकष निश्चित करण्यात आलेले आहेत.
  - लाभार्थ्यांची निवड शासन निर्णयातील निकषांनुसार, ग्रामसभेमार्फत करण्यात येते. सदर यादीगट विकास अधिकारी यांच्यामार्फत अंतिम मंजूरीसाठी जिल्हास्तरीय समितीकडे पाठविण्यात येते.
  - लाभार्थी, आवास प्लस मधील प्रतीक्षा यादीत नाव असलेले व आवास प्लस प्रणालीवर नोंद झालेले परंतु automatic system द्वारे reject झालेले.
  - लाभार्थी कुटुंबाने महाराष्ट्र राज्यात कोठेही घरकुल योजनेचा लाभ घेतलेला नसावा.
- **अर्थसहाय्य** -
  - इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत निधी उपलब्ध करुन दिला जातो.
  - राज्यस्तरीय बँक खात्यातून (SNA) लाभार्थ्यांच्या बँक /पोस्ट खात्यामध्ये टप्पानिहाय निधी AwaasSoft व PFMS प्रणालीद्वारे DBT योजनेंतर्गत वितरीत करण्यात येतो.
  - घरकुल अनुदाना व्यतिरिक्त स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) (SBM) अंतर्गत पात्र लाभार्थ्यास शौचालयासाठी रु.12,000/- प्रोत्साहनपर अनुदान व मनरेगा (MGNREGA) अंतर्गत 90/95 इतक्या अकुशल मनुष्य दिवसांची मजूरी साधारणपणे रु.24,570/- देय.
  - क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजनेंतर्गत ५०० चौ.फुट जागेपर्यंत रू. ५०,०००/- पर्यंत अनुदान देय.

# प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण
## संचित प्रगती अहवाल - ३० सप्टेंबर २०२३

| अ.क्र. | जिल्हा | उद्दिष्ट (PWL+Awaas+) | मंजूर | पूर्ण | % | राज्य रँक | राष्ट्रीय रँक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सिंधुदुर्ग | ५०८३ | ५०८३ | ४९१६ | ९६.७१% | १ | ४२ |
| २ | रत्नागिरी | ९७८६ | ९७८६ | ९३८९ | ९५.९४% | २ | ४४ |
| ३ | पालघर | ३५१८८ | ३५१८८ | ३३३६६ | ९४.८२% | ४ | १०६ |
| ४ | रायगड | ९८१९ | ९८१९ | ९३१० | ९४.८२% | ५ | ८१ |
| ५ | ठाणे | ९५७२ | ९५७२ | ८९११ | ९३.०९% | ७ | १६२ |
| कोकण विभाग | | ६९४४८ | ६९४४८ | ६५८९२ | ९४.८८% | १ | |
| ६ | गोंदिया | ९५८४० | ९५८४० | ९१८२३ | ९५.८१% | ३ | २०३ |
| ७ | गडचिरोली | ३१६१० | ३१६१० | २८७०७ | ९०.८२% | ९ | ३२२ |
| ८ | वर्धा | १७७०१ | १७७०१ | १५९२५ | ८९.९७% | १२ | १५० |
| ९ | नागपूर | ३६२४१ | ३६२४१ | ३२४७० | ८९.५९% | १३ | ३७९ |
| १० | भंडारा | ६३५६० | ६३५६० | ५६९०४ | ८९.५३% | १४ | ३८५ |
| ११ | चंद्रपूर | ४२३९३ | ४२३९३ | ३६५५३ | ८६.२२% | १७ | २६४ |
| नागपूर विभाग | | २८७३४५ | २८७३४५ | २६२३८२ | ९१.३१% | २ | |
| १२ | नाशिक | ८९२९२ | ८९२९२ | ८२७११ | ९२.६३% | ८ | २०४ |
| १३ | अहमदनगर | ६०३७६ | ६०३७६ | ५४७०२ | ९०.६०% | १० | १२४ |
| १४ | नंदुरबार | ११८७५६ | ११८७५६ | १०७४०६ | ९०.४४% | ११ | ३७८ |
| १५ | धुळे | ६४६३४ | ६४६३४ | ५७३७४ | ८८.७७% | १५ | ३२३ |
| १६ | जळगाव | ७८३३८ | ७८३३८ | ६३९५८ | ८१.६४% | २३ | ४८७ |
| नाशिक विभाग | | ४११३९६ | ४११३९६ | ३६६१५१ | ८९.००% | ३ | |
| १७ | सातारा | १४३९४ | १४३९४ | १३४५६ | ९३.४८% | ६ | ५४ |
| १८ | कोल्हापूर | १७१०५ | १७१०५ | १४८१८ | ८६.६३% | १६ | १६० |
| १९ | पुणे | १९१५२ | १९१५२ | १६०२९ | ८३.६९% | १९ | ४२६ |
| २० | सांगली | २१००२ | २१००२ | १७५०६ | ८३.३५% | २१ | ५१२ |
| २१ | सोलापूर | ४५९७१ | ४५९७१ | ३७२५४ | ८१.०४% | २४ | ४२९ |
| पुणे विभाग | | ११७६२४ | ११७६२४ | ९९०६३ | ८४.२२% | ४ | |
| २२ | अकोला | ४७७८७ | ४७७८७ | ४०७८१ | ८५.३४% | १८ | ४४७ |
| २३ | यवतमाळ | ६३५४७ | ६३५४७ | ५३००० | ८३.४०% | २० | ३२० |
| २४ | अमरावती | ९२५७३ | ९२५७३ | ७६३०९ | ८२.४३% | २२ | ४९८ |
| २५ | वाशिम | १९०७८ | १९०७८ | १५०५६ | ७८.९२% | २६ | ३५८ |
| २६ | बुलढाणा | ४४५८३ | ४४५८३ | ३१०१७ | ६९.५७% | ३४ | ४३६ |
| अमरावती विभाग | | २६७५६८ | २६७५६८ | २१६१६३ | ८०.७९% | ५ | |
| २७ | औरंगाबाद | ३६१३९ | ३६१३९ | २८७५८ | ७९.५८% | २५ | ३२८ |
| २८ | नांदेड | ६८५४६ | ६८५४६ | ५११७१ | ७४.६५% | २७ | ५३० |
| २९ | जालना | २४०२१ | २४०२१ | १७९१८ | ७४.५९% | २८ | ४०१ |
| ३० | हिंगोली | १८०८३ | १८०८३ | १३३९४ | ७४.०७% | २९ | १८१ |
| ३१ | बीड | ३४६७० | ३४६७० | २५१८७ | ७२.६५% | ३० | ४२४ |
| ३२ | लातूर | २०३६८ | २०३६८ | १४७६२ | ७२.४८% | ३१ | ४३३ |
| ३३ | परभणी | १८७६४ | १८७६४ | १३२८५ | ७०.८०% | ३२ | २६८ |
| ३४ | उस्मानाबाद | १३७४६ | १३७४६ | ९७०२ | ७०.५८% | ३३ | ४३१ |
| औरंगाबाद विभाग | | २३४३३७ | २३४३३७ | १७४१७७ | ७४.३३% | ६ | |
| एकूण | | १३८७७१८ | १३८७७१८ | ११८३८२८ | ८५.३% | | |

# रमाई आवास योजना

## संचित प्रगती अहवाल - ३० सप्टेंबर २०२३

| अ.क्र. | जिल्हा | उद्दिष्ट | मंजूर | पूर्ण | % | राज्य रँक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | धुळे | ४३२ | ४३२ | ४१९ | ९७.०% | ८ |
| २ | अहमदनगर | १९८ | १९८ | १८२ | ९१.९% | १४ |
| ३ | जळगाव | ५७० | ५६८ | ५०३ | ८८.६% | १६ |
| ४ | नाशिक | १४३ | १३७ | १०८ | ७८.८% | २३ |
| ५ | नंदुरबार | १० | ० | ० | ०.०% | २९ |
| **नाशिक विभाग** | | **१३५३** | **१३३५** | **१२१२** | **९०.८%** | **१** |
| ६ | वाशिम | ६४ | ६४ | ६२ | ९६.९% | ९ |
| ७ | बुलढाणा | ३७१ | ३७१ | ३५४ | ९५.४% | ११ |
| ८ | अमरावती | ४५१ | ४४४ | ४१६ | ९३.७% | १२ |
| ९ | अकोला | ३७४ | ३७३ | ३४६ | ९२.८% | १३ |
| १० | यवतमाळ | ५९४ | ५९३ | ४७७ | ८०.४% | २२ |
| **अमरावती विभाग** | | **१८५४** | **१८४५** | **१६५५** | **८९.७%** | **२** |
| ११ | हिंगोली | ३५ | ३५ | ३५ | १००% | १ |
| १२ | लातूर | १७ | १३ | १३ | १००% | ३ |
| १३ | नांदेड | ५० | ४२ | ४२ | १००% | ४ |
| १४ | परभणी | ५६ | ५६ | ५६ | १००% | ५ |
| १५ | बीड | ९२ | ८६ | ७८ | ९०.७% | १५ |
| १६ | औरंगाबाद | ५७ | ५१ | ४४ | ८६.३% | १८ |
| १७ | उस्मानाबाद | २४७ | २४७ | २०६ | ८३.४% | २० |
| १८ | जालना | ३८ | ३६ | ३० | ८३.३% | २१ |
| **औरंगाबाद विभाग** | | **५९२** | **५६६** | **५०४** | **८९.०%** | **३** |
| १९ | कोल्हापूर | ७ | ७ | ७ | १००% | २ |
| २० | सातारा | २४ | २४ | २४ | १००% | ६ |
| २१ | सोलापूर | २३१ | २०२ | १९४ | ९६% | १० |
| २२ | सांगली | ३८ | २६ | २२ | ८५% | १९ |
| २३ | पुणे | १८८ | १७४ | १३० | ७४.७% | २४ |
| **पुणे विभाग** | | **४८८** | **४३३** | **३७७** | **८७.१%** | **४** |
| २४ | वर्धा | ५० | ५० | ४९ | ९८.०% | ७ |
| २५ | नागपूर | ४८ | ४८ | ४२ | ८७.५% | १७ |
| २६ | चंद्रपूर | ३५ | ३३ | १९ | ५७.६% | २५ |
| **नागपूर विभाग** | | **१३३** | **१३१** | **११०** | **८४.०%** | **५** |
| २७ | रायगड | २ | ० | ० | ०.०% | ३१ |
| २८ | रत्नागिरी | १ | ० | ० | ०.०% | ३२ |
| **कोकण विभाग** | | **३** | **०** | **०** | **०.०%** | **६** |
| **एकूण** | | **४४२३** | **४३१०** | **३८५८** | **८९.५%** | |

# शबरी आवास योजना

## संचित प्रगती अहवाल - ३० सप्टेंबर २०२३

| अ.क्र. | जिल्हा | उद्दिष्ट | मंजूर | पूर्ण | % | राज्य रँक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | सोलापूर | ८९४ | ६५३ | ५७९ | ८८.६७% | ३ |
| २ | सांगली | ८० | ५० | ४३ | ८६.००% | ४ |
| ३ | सातारा | १९७ | १९७ | १६४ | ८३.२५% | ६ |
| ४ | पुणे | ६७३६ | ३५३५ | २६४१ | ७४.७१% | १० |
| ५ | कोल्हापूर | ६० | २५ | १३ | ५२.००% | २४ |
| पुणे विभाग | | ७९६७ | ४४६० | ३४४० | ७७.१३% | १ |
| ६ | नाशिक | २७४५६ | १३४२१ | १०१२५ | ७५.४४% | ९ |
| ७ | धुळे | १८५१८ | ११२०० | ७४१९ | ६६.२४% | १३ |
| ८ | अहमदनगर | ८६४६ | ६२५८ | ४१३१ | ६६.०१% | १४ |
| ९ | नंदुरबार | ४७०४६ | १३२७८ | ८७४६ | ६५.८७% | १५ |
| १० | जळगाव | १३३३१ | ८३१७ | ४९९९ | ६०.११% | १९ |
| नाशिक विभाग | | ११४९९७ | ५२४७४ | ३५४२० | ६७.५०% | २ |
| ११ | सिंधुदुर्ग | ४३ | २९ | २८ | ९६.५५% | १ |
| १२ | रत्नागिरी | ३४० | २५६ | २३५ | ९१.८०% | २ |
| १३ | पालघर | १४३८५ | १०१६२ | ७१६१ | ७०.४७% | ११ |
| १४ | ठाणे | ५४३० | ३३८८ | १८८० | ५५.४९% | २२ |
| १५ | रायगड | ६६१० | ५४७७ | २२६८ | ४१.४१% | ३१ |
| कोकण विभाग | | २६८०८ | १९३१२ | ११५७२ | ५९.९२% | ३ |
| १६ | यवतमाळ | १४३२२ | ९७२० | ५३२१ | ५४.७४% | २३ |
| १७ | अमरावती | १५२३५ | ७२७६ | ३७४२ | ५१.४३% | २५ |
| १८ | बुलढाणा | ४१९१ | १९२१ | ९७१ | ५०.५५% | २६ |
| १९ | वाशिम | २९७० | १७५३ | ८३१ | ४७.४०% | २८ |
| २० | अकोला | ५८१५ | २८३७ | १०७७ | ३७.९६% | ३२ |
| अमरावती विभाग | | ४२५३३ | २३५०७ | ११९४२ | ५०.८०% | ४ |
| २१ | भंडारा | ६३३६ | ४८९० | ३७३० | ७६.२८% | ८ |
| २२ | गोंदिया | ५५९९ | ४०१३ | २६२५ | ६५.४१% | १६ |
| २३ | गडचिरोली | १०९५१ | ७७५९ | ५०३५ | ६४.८९% | १७ |
| २४ | वर्धा | ५६९२ | ४८५९ | २९१४ | ५९.९७% | २० |
| २५ | चंद्रपूर | २३१८२ | १२४१० | ५४९९ | ४४.३१% | २९ |
| २६ | नागपूर | १३१८८ | १०७२८ | २५२८ | २३.५६% | ३४ |
| नागपूर विभाग | | ६४९४८ | ४४६५९ | २२३३१ | ५०.००% | ५ |
| २७ | जालना | २९५६ | ५३४ | ४५९ | ८५.९६% | ५ |
| २८ | लातूर | १५३८ | ६०५ | ४७९ | ७९.१७% | ७ |
| २९ | नांदेड | ७९९१ | १३७८ | ९५४ | ६९.२३% | १२ |
| ३० | औरंगाबाद | ७७८७ | ३६०८ | २२९७ | ६३.६६% | १८ |
| ३१ | उस्मानाबाद | ५४९ | ३५५ | २१० | ५९.१५% | २१ |
| ३२ | बीड | २२३० | ९३२ | ४७१ | ५०.५४% | २७ |
| ३३ | परभणी | ३८८७ | १६०२ | ६६४ | ४१.४५% | ३० |
| ३४ | हिंगोली | १८०३५ | ९२५५ | ३२९६ | ३५.६१% | ३३ |
| औरंगाबाद विभाग | | ४४९७३ | १८२६९ | ८८३० | ४८.३३% | ६ |
| एकूण | | ३०२२२६ | १६२६८१ | ९३५३५ | ५७.५०% | |

# पारधी आवास योजना
## संचित प्रगती अहवाल - ३० सप्टेंबर २०२३

| अ.क्र. | जिल्हा | उद्दिष्ट | मंजूर | पूर्ण | % | राज्य रँक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | धुळे | ४३२ | ४३२ | ४१९ | ९७.०% | ८ |
| २ | अहमदनगर | १९८ | १९८ | १८२ | ९१.९% | १४ |
| ३ | जळगाव | ५७० | ५६८ | ५०३ | ८८.६% | १६ |
| ४ | नाशिक | १४३ | १३७ | १०८ | ७८.८% | २३ |
| ५ | नंदुरबार | १० | ० | ० | ०.०% | २९ |
| **नाशिक विभाग** | | **१३५३** | **१३३५** | **१२१२** | **९०.८%** | **१** |
| ६ | वाशिम | ६४ | ६४ | ६२ | ९६.९% | ९ |
| ७ | बुलढाणा | ३७१ | ३७१ | ३५४ | ९५.४% | ११ |
| ८ | अमरावती | ४५१ | ४४४ | ४१६ | ९३.७% | १२ |
| ९ | अकोला | ३७४ | ३७३ | ३४६ | ९२.८% | १३ |
| १० | यवतमाळ | ५९४ | ५९३ | ४७७ | ८०.४% | २२ |
| **अमरावती विभाग** | | **१८५४** | **१८४५** | **१६५५** | **८९.७%** | **२** |
| ११ | हिंगोली | ३५ | ३५ | ३५ | १००% | १ |
| १२ | लातूर | १७ | १३ | १३ | १००% | ३ |
| १३ | नांदेड | ५० | ४२ | ४२ | १००% | ४ |
| १४ | परभणी | ५६ | ५६ | ५६ | १००% | ५ |
| १५ | बीड | ९२ | ८६ | ७८ | ९०.७% | १५ |
| १६ | औरंगाबाद | ५७ | ५१ | ४४ | ८६.३% | १८ |
| १७ | उस्मानाबाद | २४७ | २४७ | २०६ | ८३.४% | २० |
| १८ | जालना | ३८ | ३६ | ३० | ८३.३% | २१ |
| **औरंगाबाद विभाग** | | **५९२** | **५६६** | **५०४** | **८९.०%** | **३** |
| १९ | कोल्हापूर | ७ | ७ | ७ | १००% | २ |
| २० | सातारा | २४ | २४ | २४ | १००% | ६ |
| २१ | सोलापूर | २३१ | २०२ | १९४ | ९६% | १० |
| २२ | सांगली | ३८ | २६ | २२ | ८५% | १९ |
| २३ | पुणे | १८८ | १७४ | १३० | ७४.७% | २४ |
| **पुणे विभाग** | | **४८८** | **४३३** | **३७७** | **८७.१%** | **४** |
| २४ | वर्धा | ५० | ५० | ४९ | ९८.०% | ७ |
| २५ | नागपूर | ४८ | ४८ | ४२ | ८७.५% | १७ |
| २६ | चंद्रपूर | ३५ | ३३ | १९ | ५७.६% | २५ |
| **नागपूर विभाग** | | **१३३** | **१३१** | **११०** | **८४.०%** | **५** |
| २७ | रायगड | २ | ० | ० | ०.०% | ३१ |
| २८ | रत्नागिरी | १ | ० | ० | ०.०% | ३२ |
| **कोकण विभाग** | | **३** | **०** | **०** | **०.०%** | **६** |
| **एकूण** | | **४४२३** | **४३१०** | **३८५८** | **८९.५%** | |

# आदिम आवास योजना

## संचित प्रगती अहवाल - ३० सप्टेंबर २०२३

| अ.क्र. | जिल्हा | उद्दिष्ट | मंजूर | पूर्ण | % | राज्य रँक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | सिंधुदुर्ग | ६६ | ५० | ५० | १००.००% | १ |
| २ | पालघर | ११३१ | ११२८ | १०१६ | ९०.०७% | २ |
| ३ | रायगड | १३९४ | १३९४ | १२४८ | ८९.५३% | ३ |
| ४ | ठाणे | १५७८ | १५७२ | १३८४ | ८८.०४% | ४ |
| ५ | रत्नागिरी | ११ | ११ | ७ | ६३.६४% | ७ |
| **कोकण विभाग** | | **४१८०** | **४१५५** | **३७०५** | **८९.१७%** | **१** |
| ६ | नांदेड | ४१९ | १८१ | १३७ | ७५.६९% | ६ |
| **औरंगाबाद विभाग** | | **४१९** | **१८१** | **१३७** | **७५.६९%** | **२** |
| ७ | गडचिरोली | १७७८ | १७५२ | १४६७ | ८३.७३% | ५ |
| ८ | चंद्रपूर | ७२३ | ६६६ | ३९९ | ५९.९१% | ८ |
| ९ | वर्धा | ३९६ | ३९३ | १५० | ३८.१७% | १० |
| **नागपूर विभाग** | | **२८९७** | **२८११** | **२०१६** | **७१.७२%** | **३** |
| १० | यवतमाळ | ४७८४ | ४६४८ | २४९२ | ५३.६१% | ९ |
| **अमरावती विभाग** | | **४७८४** | **४६४८** | **२४९२** | **५३.६१%** | **४** |
| ११ | नाशिक | ९८ | ३७ | १२ | ३२.४३% | ११ |
| **नाशिक विभाग** | | **९८** | **३७** | **१२** | **३२.४३%** | **५** |
| १२ | पुणे | ७५ | ७१ | १५ | २१.१३% | १२ |
| **पुणे विभाग** | | **७५** | **७१** | **१५** | **२१.१३%** | **६** |
| **एकूण** | | **१२४५३** | **११९०३** | **८३७७** | **७०.३८%** | |

# यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना

## संचित प्रगती अहवाल - ३० सप्टेंबर २०२३

| अ.क्र. | जिल्हा | उद्दिष्ट | मंजूर | पूर्ण | % | राज्य रँक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | रत्नागिरी | ९५ | ७३ | ६५ | ८९.०४% | ३ |
| **कोकण विभाग** | | **९५** | **७३** | **६५** | **८९.०४%** | **१** |
| २ | सातारा | १०८ | १०८ | ७९ | ७३.१५% | ४ |
| ३ | कोल्हापूर | ६५ | ६५ | ४७ | ७२.३१% | ५ |
| ४ | सोलापूर | १४ | १४ | ३ | २१.४३% | ९ |
| ५ | पुणे | २० | ० | ० | ०.००% | २८ |
| **पुणे विभाग** | | **२०७** | **१८७** | **१२९** | **६८.९८%** | **२** |
| ६ | लातूर | ७७ | १० | १० | १००.००% | २ |
| ७ | उस्मानाबाद | १७७३ | ३७९ | २३५ | ६२.०१% | ७ |
| ८ | परभणी | ४४४ | २४८ | १ | ०.४०% | १२ |
| ९ | जालना | २२२३ | ६३७ | ० | ०.००% | २३ |
| **औरंगाबाद विभाग** | | **४५१७** | **१२७४** | **२४६** | **१९.३१%** | **३** |
| १० | अमरावती | ५०७ | ३४४ | २२६ | ६५.७०% | ६ |
| ११ | यवतमाळ | २१७९ | १५२९ | ३४ | २.२२% | ११ |
| **अमरावती विभाग** | | **२६८६** | **१८७३** | **२६०** | **१३.८८%** | **४** |
| १२ | गोंदिया | २० | २० | २० | १००.००% | १ |
| १३ | नागपूर | १६ | १२ | ५ | ४१.६७% | ८ |
| १४ | चंद्रपूर | ५४६१ | ३९८१ | १३८ | ३.४७% | १० |
| १५ | भंडारा | १२६३ | ११९९ | ० | ०.००% | १७ |
| **नागपूर विभाग** | | **६७६०** | **५२१२** | **१६३** | **३.१३%** | **5** |
| १६ | अहमदनगर | २० | २० | ० | ०.००% | १३ |
| १७ | धुळे | १०२ | १०२ | ० | ०.००% | १९ |
| **नाशिक विभाग** | | **१२२** | **१२२** | **०** | **०.००%** | **६** |
| **एकूण** | | **१४३८७** | **८७४१** | **८६३** | **९.८७%** | |

# बहुमजली इमारत बांधकामामुळे भुमिहीन लाभार्थ्यांचे घरकुलाचे स्वप्न पूर्ण

येरखेडा ग्रामपंचायत कामठी तालुक्यातील नागपूर जिल्ह्यामध्ये आहे. येरखेडा या गावातील शिव मंदीर प्रसिध्द असून महाशिवरात्रीला येथे मोठ्या प्रमाणात भाविक दर्शनाकरीता येतात. या ग्रामपंचायतीची एकूण लोकसंख्या १५,७५७, असून ३,७२४ कुटूंब गावात राहतात. ग्रामपंचायतीमध्ये ग्रामीण विविध आवास योजने अंतर्गत आजपर्यंत ७७ लाभार्थ्यांना घरकुलांचा लाभ देण्यात आला.

येरखेडा येथे प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत उत्कृष्ट बहुमजली इमारत उभारण्यात आली आहे. त्यांच्या या यशस्वी कामगिरीसाठी ग्रामपंचायतीचे सरपंच श्रीमती मंगला मनीष कारेमोरे, उपसरपंच श्रीमती शोभा कराले, ग्रामसेवक श्री. जितेंद्र डवरे व ग्रामाण गृहनिर्माण अभियंता यांनी परिश्रम घेतले. त्यांच्या या यशात ग्रामपंचायत सदस्य, लाभार्थी व ग्रामस्थांचे मोलाचे सहकार्य लाभले आहे.

येरखेडा गावातील ३ घरकुल लाभार्थ्यांना ग्रामीण आवास योजने अंतर्गत घरकुल मंजूर झाले. परंतु घरकुल बांधायला त्यांच्याकडे पुरेशी जागा नसल्याने त्यांना घरकुल बांधकाम करणे शक्य नव्हते. तसेच जागेच्या वाढत्या किमती व गावामध्ये जागेची कमतरता लक्षात घेता या सर्व लाभार्थ्यांचे घराचे स्वप्न पूर्ण होईल की नाही असे वाटत होते. घरकुल बांधकामासाठी जागा नसल्यामुळे त्यांना पहिला हप्ता देण्यास अडचण निर्माण झाली होती.

अशात गावामध्ये "महा आवास अभियान २०२१-२२" अंतर्गत कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यशाळे मध्ये या ३ घरकुल लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करून देण्याकरिता G+1 बाबत मार्गदर्शन करण्यात आले. तसेच त्यांच्या या अडचणीवर मार्ग काढण्यासाठी ग्रामसेवक व ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांनी त्यांना बहुमजली इमारत बांधण्याचा पर्याय सुचविला आहे. या तीनही लाभार्थ्यांना बहुमजली इमारत उभारणीचा प्रस्ताव आवडला व त्यांनी याकरीता सहमती दर्शवली. तसेच या कार्यशाळेमध्ये लाभार्थ्याला बांधकाम साहित्य उपलब्ध होण्यासाठी बचत गट मार्फत सिमेंट विटा व इतर साहित्य वाजवी दरात नजीकच्या ठिकाणी उपलब्ध करून व्हावे यासाठी घरकुल मार्ट सुरू करण्यात आले असून त्यामुळे लाभार्थ्यांचा वेळ व पैसा वाचणार असल्याची माहिती दिली.

सर्व लाभार्थी बहुमजली इमारत बामधकाम करण्यास तयार झाल्यावर त्यांना पहिल्या हप्त्याचे वितरण करण्यात आले. त्यानंतर त्यांच्या बांधकामाच्या टप्प्यानुसार पुढील सर्व हप्ते पंचायत समितीस्तरावरून लाभार्थ्यांना वेळेत वितरीत करण्यात आले. बहुमजली इमारत बांधकामामुळे लाभार्थांना आर्थिक फायदा झाला. या घरकुल लाभार्थ्यांची बहुमजली इमारत बांधल्याने त्यांच्या कुटुंबाला निवारा मिळाला.

या सोबतच इतर शासकीय योजनांच्या कृतीसंगमातून शासकीय योजनांचा लाभ मिळाला आहे. जसे- महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने मधून रोजगार, स्वच्छ भारत मिशन-ग्रामीण मधून शौचालय, प्रधानमंत्री उज्ज्वल योजने मधून गॅस जोडणी, सौभाग्य योजने मधून विद्युत जोडणी, राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियाना मधून उपजिविकेचे साधन. याकामी त्यांना सहकार्य करणारे सरपंच, उपसरपंच, जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, गटविकास अधिकारी, विस्तार अधिकारी, ग्रामसेवक व इतर शासकीय यंत्रणा यांचे शतशः ऋणी असल्याचे मत लाभार्थ्यांनी व्यक्त केले.

या बहुमजली इमारती मुळे घरकुल भुमिहीन घरकुल लाभार्थ्यांचे घराचे स्वप्न पूर्ण झाले असून हे सर्व लाभार्थी त्यांच्या कुटुंबासोबत आनंदाने वास्तव्य करत आहे.



# पोही ग्रामपंचायतीची महा आवास अभियान सर्वोत्कृष्ट कामगिरी

पोही ग्रामपंचायत अंजनगाव सुर्जी तालुक्यातील अमरावती जिल्ह्यामध्ये आहे. पोही ग्रामपंचायतीची एकूण लोकसंख्या ८७२ असून २४० कुटुंब वास्तव्यास आहे. या ग्रामपंचायतीमध्ये प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत ३९ लाभार्थ्यांना घरकुलाचा लाभ दिला आहे.

"महा आवास अभियान २०२१-२२" या अभियान कालावधीत या ग्रामपंचायतीमध्ये प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत विविध उपक्रम राबविण्यात आले. यामध्ये ग्रामस्तरीय महा आवास अभियान कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यशाळेला सर्व ग्रामस्थ, लाभार्थी, सरपंच, उपसरपंच, ग्रामसेवक, तलाठी, तालुकास्तरीय अधिकारी/कर्मचारी व ग्रामीण गृहनिर्माण अभियंता उपस्थित होते. या कार्यशाळेचे आयोजन व सादरीकरण ग्रामसेवक व तलाठी यांनी केले.

"महा आवास अभियान २०२१-२२" अंतर्गत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत विविध ग्रामीण आवास योजना मध्ये विविध उपक्रम राबवून ग्रामपंचायतीने सर्वोत्कृष्ट कामगिरी केली आहे. त्यांच्या या यशस्वी कामगिरीसाठी ग्रामपंचायतीचे सरपंच सौ.स्वाती रामेश्वर इंगोले, उपसरपंच श्री.राजू विष्णुपंत घडेकर, ग्रामसेवक श्री.साहेबराव सहदेवराव वानखडे व ग्रामाण गृहनिर्माण अभियंता श्री.कपिल हरिचंद्र कौतीक्कर यांनी परिश्रम घेतले. त्यांच्या या यशात ग्रामपंचायत सदस्य, घरकुल लाभार्थी व ग्रामस्थांचे मोलाचे सहकार्य लाभले.

"महा आवास अभियान २०२१-२२" अंतर्गत उदिष्टपूर्तीसाठी प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत आवास योजनांतर्गत ग्रामपंचायतमध्ये घरकुले मंजूर करण्यात आली. त्या सर्व घरकुलांचे बांधकाम भौतिकदृष्ट्या पूर्ण झाले आहे. सदर घरकुलांचे प्रस्ताव करण्यासाठी सरपंच व ग्रामसेवक स्वतः लाभार्थ्यांच्या घरी जावून त्यांना प्रोत्साहन केले. त्यानुसार लाभार्थ्यांनी आवश्यक ती कागदपत्रे ग्रामपंचायतीकडे सादर केली. त्यानुसार परिपूर्ण प्रस्ताव तयार करुन तालुकास्तरावर सादर केले. तालुकास्तरावरून सर्व प्रस्तावांना मंजूरी देण्यात आली. परंतु सर्वांत मोठी अडचण होती ती घरकुल बांधकामासाठी जोगेची, याकरीता स्वतः सरपंच व ग्रामसेवक यांनी गावात पहाणी करून गावात भूमिहीन लाभार्थ्यांना घरकुल बांधकामासाठी जागा उपलब्ध करून दिली. त्यामुळे घरकुल लाभार्थ्यांचा जागेच्या अडचणींचे निरासन करून सर्व घरकूले शौचालय व इतर मुलभूत नागरी सुविधासह पूर्ण झाली.

याकरीता ग्रामपंचायतीमध्ये नियमित बैठकांचे, लाभार्थी मेळाव्याचे व बँक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. या माध्यमातून लाभार्थ्यांना विविध ग्रामीण गृहनिर्माण योजनांविषयी मार्गदर्शन करून घरकुल बांधकामास प्रोत्साहीत करण्यात आले. त्यांच्या या कामात जिल्हा व तालुका स्तरावरुन सक्रीय सहभाग नोंदविला.

सर्वांच्या सक्रीय सहभागामुळे लाभार्थ्यांना हक्काचे पक्के घर मिळाल्याने सर्व लाभार्थी आनंदाने त्यांच्या स्वतःच्या घरात वास्तव्य करत आहेत. त्यांच्या या सर्वोत्कृष्ट कामगिरीची नोंद राज्य, विभाग, जिल्हा, तालुका व ग्रामस्तरावर घेण्यात आली. याकरीता पोही ग्रामपंचायतीला सर्व स्तरावर महा आवास अभियान पुरस्कार स्वरूप प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. यामुळे गावामध्ये व घरकुल लाभार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.





# दिपकनगर येथे बहुमजली इमारतीची उभारणी

दिपकनगर ग्रामपंचायत तुळजापूर तालुक्यातील उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये आहे. या ग्रामपंचायतीची एकूण लोकसंख्या १,२५० इतकी असून गावात १३० कुटुंब आहेत. या गावात विविध ग्रामीण गृहनिर्माण योजने अंतर्गत एकूण ६५ लाभार्थ्यांना घरकुलाचा लाभ देण्यात आला आहे.

"महा आवास अभियान २०२१-२२" मध्ये प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत **ग्रामपंचायत दिपकनगर यांची सर्वोत्कृष्ट बहुमजली इमारत म्हणून** गौरविण्यात आले आहे. यासाठी ग्रामस्तरीय महा आवास अभियान कार्यशाळा ग्रामपंचायत कार्यालयात संपन्न झाली. या कार्यशाळेला सर्व ग्रामस्थ, लाभार्थी, सरपंच, उपसरपंच, ग्रामसेवक, तलाठी, तालुकास्तरीय अधिकारी/कर्मचारी व ग्रामीण गृहनिर्माण अभियंता उपस्थित होते. या कार्यशाळेचे आयोजन व सादरीकरण ग्रामसेवक व तलाठी यांनी केले.

"महा आवास अभियान २०२१-२२" अंतर्गत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत बहुमजली इमारत उभारणे या उपक्रमात ग्रामपंचायतीने सर्वोत्कृष्ट कामगिरी केली आहे. त्यांच्या या यशस्वी कामगिरीसाठी ग्रामपंचायतीचे सरपंच श्रीमती चैत्राली तानाजी राठोड, उपसरपंच श्रीमती सुवर्णा सतिश राठोड, ग्रामसेवक श्रीमती सोनम अशोक हजारे व ग्रामाण गृहनिर्माण अभियंता श्री. अक्षय रमाकांत घोडके यांनी परिश्रम घेतले.

दिपकनगर गावातील ३ घरकुल लाभार्थ्यांना ग्रामीण आवास योजने अंतर्गत घरकुल मंजूर झाले होते. परंतु घरकुल बांधायला या लाभार्थ्यांकडे पुरेशी जागा उपलब्ध नसल्याने त्यांना घरकुल बांधकाम करणे शक्य नव्हते. अशातच त्यांना बहुमजली इमारती बाबत कार्यशाळेत माहिती मिळाली. तसेच या अडचणीवर मार्ग काढण्यासाठी ग्रामसेवक व ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांनी त्यांना यासर्व लाभार्थ्यींना बहुमजली इमारत बांधण्याचा पर्याय सुचविला आहे. याबाबत तालुकास्तरीय अधिकारी यांनी वेळोवेळी मार्गदर्शन केले.

त्यानुसार "महा आवास अभियान २०२१-२२" अंतर्गत या ३ घरकुल लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करून देण्याकरिता G+1 बाबत विशेष बैठक घेवून मार्गदर्शन केले. तसेच लाभार्थ्याला बांधकाम साहित्य उपलब्ध होण्यासाठी बचत गटा मार्फत सिमेंट विटा व इतर साहित्य उपलब्ध करून देण्यात आले आहे. अशा प्रकारे या घरकुल लाभार्थ्यांची बहुमजली इमारत बांधल्याने त्यांच्या कुटुंबाला निवारा मिळाला.

या सोबतच इतर शासकीय योजनांशी कृतीसंगमातून इतरही शासकीय योजनांचा लाभ मिळाला. याकामी त्यांना सहकार्य करणारे सरपंच, उपसरपंच, जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, गटविकास अधिकारी, विस्तार अधिकारी, ग्रामसेवक व इतर शासकीय यंत्रणा यांचे शतशः ऋणी असल्याची प्रतिक्रीया लाभार्थ्यांनी व्यक्त केली.

दिपकनगर गावात उभारण्यात आलेल्या बहुमजली इमारतीमुळे ३ लाभार्थ्यांचे घरकुलाचे स्वप्न पूर्ण झाले असून याबाबत सर्वस्तरावर त्यांचे कौतुक होत आहे. तसेच याप्रमाणे तालुक्यातील इतरही ग्रामपंचायतीमध्ये बहुमजली इमारतींची उभारणी करून भुमिहीन लाभार्थ्यांचा जागेचा प्रश्न मार्ग लावणेबाबत तालुकास्तरीवर कार्यवाही करण्यात येत असल्याचे गट विकास अधिकारी म्हणाले.





# महा आवास अभियानात कळवण तालुक्याची सर्वोत्कृष्ट कामगिरी

कळवण तालुका नाशिक जिल्ह्यात आहे. या तालुक्यातील पंचायत समिती कळवण अंतर्गत ८६ ग्रामपंचायतींचा समावेश आहे.

"महा आवास अभियान २०२१-२२" या अभियान कालावधीत राबविण्यात आलेल्या उपक्रमांचे मूल्यमापन करून राज्य पुरस्कृत आवास योजना मध्ये केलेल्या सर्वोत्कृष्ट कामगिरीची नोंद राज्यस्तरावर घेण्यात आली आहे. कळवण तालुकास्तरीय महा आवास अभियान कार्यशाळा तालुक्याचे मा. आमदार यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाली. या कार्यशाळेला तालुक्यातील सबंधीत सर्व अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते. या कार्यशाळेचे आयोजन व सादरीकरण गट विकास अधिकारी यांनी केले. गट विकास अधिकारी यांनी सर्व उपस्थितांना अभियानाच्या यशस्वतेसाठी सुचना व मार्गदर्शन केले.

"महा आवास अभियान ग्रामीण" अंतर्गत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत विविध ग्रामीण आवास योजना मध्ये विविध उपक्रम राबवून तालुक्याने सर्वोत्कृष्ट कामगिरी केली आहे. तालुक्याच्या यशस्वी कामगिरीसाठी पंचायत समितीचे गट विकास अधिकारी, श्री.निलेश शांताराम पाटील, सहाय्यक गट विकास अधिकारी, श्रीमती व्ही. एस. सोनवणे, विस्तार अधिकारी, श्री. एस. डी. महाले व डेटा एन्ट्री ऑपरेटर श्री.महेद्र शामराव देवरे यांनी अहोरात्र परिश्रम घेतले. त्यांच्या या यशात तालुका अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापन समितीच्या सदस्यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

अभियान कालावधीत गृहनिर्माण संबंधीत नोडल अधीकारी यांच्या वेळोवेळी आढावा बैठका घेण्यात आल्या. नोडल अधीकारी व ग्रामीण गृहनिर्माण अभीयंता यांच्याकडून लाभार्थ्यांना वारंवार गृहभेटी देऊन मार्गदर्शन करण्यात आले. अभियान कालावधीत ग्रामविकास अधिकारी, ग्रामसेवक, सरपंच व लाभार्थी यांच्यासमवेत सभा घेऊन घरकुल 'बांधकाम विहीत कालावधीत पूर्ण करण्याच्यादृष्टीने मार्गदर्शन करण्यात आले.

प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत आवास योजनांतर्गत घरकुल बांधकामासाठी जागा उपलब्ध नसलेल्या २१ लाभार्थ्यांपैकी २१ लाभार्थ्यांना इतर मार्गाने (त्यांच्या कुटुंबाकडून) जागा उपलब्ध करुण देण्यात आली. यामुळे या २१ भुमिहीन लाभार्थ्यांचा जागेचा प्रश्न मार्गी लागला. तसेच या सर्व लाभार्थ्यांचे घरकुल पूर्ण करून पंचायत समिती कळवण यांनी एक आदर्श निर्माण केला आहे.

घरकुल बांधकामासाठी वाळूचा प्रश्न सोडविण्यासाठी नदीत असलेली वाळू घरकुल लाभार्थ्यास उपलब्ध करुण देण्यासाठी महसूल विभागाच्या समन्वय साधला. त्यामुळे घरकुल लाभार्थ्यांना नदी पात्रातून वाळू उपसा करण्याची परवानगी देण्यात आली. यामुळे अभियान कालावधीत जास्तीत जास्त घरकुलांची निर्मिती करणे शक्य झाले. याकरीता महसुल विभागचे विशेष सहकार्य लाभले. त्यांच्या कामगिरीसाठी सर्वोत्कृष्ट तालुका म्हणून सर्व स्तरांवर प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले आहे.

महा आवास अभियान अंतर्गत कळवण तालुक्यामध्ये घरकुलांना प्रधान्याने मंजूरी देणे, मंजुर घरकुलांना पहिल्या हप्ता त्वरीत वितरीत करणे, लाभार्थीनिहाय घरकुल बांधकामा पूर्ण करण्याचे नियोजन, घरकुलांना नियमित क्षेत्रीय भेटी देवून लाभार्थ्यांना आवश्यक मार्गदर्शन करणे, लाभार्थ्यांच्या अडचणी समजून त्यावर मार्ग काढणे , आढावा बैठकी, लाभार्थी मेळावे, बँक मेळावे आयोजित करणे व सर्वांचा सहभाग घेणे, इ. उपक्रम तालुक्यात राबविण्यात आले. तसेच लाभार्थ्यांना मंजूरी पत्र वितरण व गृह प्रवेश कार्यक्रमांचे आयोजन केल्यामुळे लाभार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. त्यामुळे घरकुल बांधकाम गतीने पूर्ण झाले. याकरीता सर्व अधिकारी, पदाधिकारी व लाभार्थी यांनी सक्रीय सहभाग नोंदविला अशी प्रतिक्रीया पंचायत समिती कळवणचे गट विकास अधिकारी श्री.निलेश पाटील यांनी व्यक्त केली.





# कोल्हापूर येथे प्रीकास्ट साहित्य वापरून डेमो हाऊसची उभारणी

कोल्हापूर येथे कमी खर्चात व कमी वेळेत जिल्हास्तरीय डेमो हाऊस प्रीकास्ट कॉंक्रीट साहित्याचा वापर करून उभारण्यात आले आहे. राज्यातील ग्रामीण भागामध्ये बेघर घटकांसाठी प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीणी व इतर राज्य पुरस्कृत योजना राबविण्यात येत आहेत. या योजनांतर्गत घरे बांधत असताना लाभार्थ्यांना घरकुल डिझाईन टायपोलॉजीच्या योग्य आकलनासाठी प्रात्यक्षिक घरे ( Demo House) उपलब्ध असणेआवश्यक आहे. यासाठी महाआवास अभियानांतर्गत तालुकास्तरीय डेमो हाऊस पंचायत समितीच्या आवारामध्ये व जिल्हा स्तरीय डेमो हाऊस जिल्हा परिषदेच्या आवारामध्ये उभारण्यात आले आहे.

कोल्हापूर जिल्ह्यातील १२ तालुक्यांमध्ये प्रत्येकी एक व जिल्हा स्तरावर एक असे एकूण १३ डेमो हाऊस उभारण्यात आले आहेत. डेमो हाऊस २७० चौ. फूट मापाचे दोन्ही बाजूस स्लोपींग रुफ यामध्ये दोन वापरायोग्य खोल्या, शौचालय, स्नानगृह यांचा समावेश आहे.

महाआवास अभियान मध्ये जिल्हा परिषदेच्या आवारामध्ये नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून प्रीकास्ट कॉंक्रीटमध्ये जिल्हास्तरीय डेमो हाऊसचे बांधकाम करणेत आले आहे. सदर बांधकाम अवघ्या पाच दिवसांच्या कालावधीमध्ये करण्यात आले असून २७० चौ. फूट बांधकामाकरीता एकूण रक्कम रु. २,७०,०००/- इतका खर्च आला आहे. अशा प्रकारे सदर बांधकाम नाविन्यपूर्ण, कमी खर्चामध्ये व कमी कालावधीमध्ये प्रीकास्ट कॉंक्रीटमध्ये करणेत आलेले आहे. याप्रकारचे बांधकाम सर्व लाभार्थ्यांनी केलेस कमी खर्चात कमी वेळेत उत्कृष्ट दर्जेदार घरकुलाची निर्मिती होऊ शकते.

जिल्हा स्तरीय डेमो हाऊस २७० चौ. फूट मापाचे दोन्ही बाजूस स्लोपोग रुफ यामध्ये दोन वापरायोग्य खोल्या, शौचालय, स्नानगृह यांचा समावेश आहे. सदर डेमो हाऊसचे बांधकाम हे पाच दिवसांमध्ये पूर्ण करणेत आलेले आहे. यामध्ये लाईन आऊट व १६० खुदाई करून बेड कॉंक्रीट वर चिरा याचे बांधकाम करणेत आलेले आहे. १६" जोता लेव्हलपर्यंत चिरा बांधकाम करून मुरुम भरावा करून त्यावर २ इंच जाडीने M-15 grade concrete flooring करणेत आलेले आहे. जोता लेव्हलच्या वर २ इंच जाडीने M-20 grade मध्ये Pre cast concrete wall बस्ती करणेत आलेल्या आहेत. रुफकाम Structural steel मध्ये करणेत यावे. पावडर कोटेड पत्रा बस्ती करणेतआलेला आहे. तसेच दोन रूमसाठी दोन दरवाजे, शौचालय व स्नानगृहासाठी बायसन पॅनेलचा एक दरवाजा सिमेंट कॉंक्रीट चौकटसह करणेत आलेला आहे. दोन रूमसाठी दोन खिडक्या तसेच शौचालयसाठी व्हेंटीलेशन ठेवणेत आलेले आहे. एक पायरी टप्पा करणेत आलेला असून इलेक्ट्रीक फिटींग, प्लंबींग, सॅनिटेशन फिटींग (शौचालय साठी सेप्टीक टॅंकसह) करणेत आलेले आहे. तसेच आतील बाजूस व बाहेरील बाजूस रंगकाम करणेत आलेले आहे.

या डेमो हाऊस लोकार्पण सोहळा कोल्हापूर जिल्ह्याचे मा.पालकमंत्री श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील व तत्कालीन मा.ग्राम विकास, मंत्री श्री. हसन मुश्रीफ यांचे हस्ते तसेच जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक व जिल्हा परिषदेचे सर्व खातेप्रमुख यांचे प्रमुख उपस्थितीत दिनांक ०६ जून, २०२२ रोजी संपन्न झाला.

डेमो हाऊसचा उपयोग जिल्हा माहिती कक्ष/कॉप-शॉप म्हणून करण्यात येत आहे. या डेमो हाऊस ला लाभार्थी भेटी देवून त्यानुसार घरकुल बांधकामासाठी त्यांना मार्गदर्शन मिळत आहे. या डेमो हाऊसमध्ये जिल्ह्यातील स्वयंतसहाय्यता महिला बचत गटांनी उत्पादित केलेल्या वस्तू व पदार्थ विक्रीसाठी कॉप-शॉप सुरू करण्यात आले असून या कॉप-शॉपला प्रचंड प्रतिसाद मिळतो आहे.





# गोळवण मध्ये लाभार्थ्यांना घरकुल देण्यासाठी लोकसहभाग

गोळवण ग्रामपंचायत मालवण तालुक्यातील सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये आहे. या ग्रामपंचायती मध्ये श्री. देव रवळनाथ मंदिर, श्री. देव गांगेश्वर मंदिर व श्री. देव रवळनाथ मंदिर, इ. प्रसिध्द मंदिरे आहेत. गोळवण ग्रामपंचायती अंतर्गत तीन गावे व 22 पाड्या-वाड्यांचा समावेश आहे. या ग्रामपंचायतीची एकूण लोकसंख्या २,११६ एकूण ६६३ कुटूंब समभावाने राहतात. गावामध्ये एकूण ३५ लाभार्थ्यांना घरकुलाचा लाभ देण्यात आला असून याकरीता ग्रामपंचायतीचे पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी व ग्रामस्थ यांनी सक्रीय सहभाग नोंदविला आहे.

गोळवण गावातील वातावरण अत्यंत धार्मिक असून सर्व जाती, धर्माचे लोक एकत्र राहतात. गावामध्ये सर्व सन मोठ्या उत्साहाने साजरे होतात. या गावामध्ये विविध ग्रामीण गृहनिर्माण योजनांतर्गत ३५ घरकुले मंजूर करण्यात आली होती. परंतु काही लाभार्थ्यांकडे घरकुल बांधकामासाठी जागा उपलब्ध नव्हती तर काही लाभार्थ्यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत बिकट होती. या सर्व अडचणींवर मार्ग काढण्यासाठी ग्रामपंचायती मध्ये सर्व ग्रामस्थांच्या उपस्थितीत बैठका घेण्यात आल्या. हे सर्व लाभार्थी आपल्याच गावचे असून आपले स्नेही, मित्र असल्याने त्यांना घरकुल बांधकामासाठी सर्व गावकरी मदत करती असा ठराव या बैठकांमध्ये घेण्यात आला.

गोळवण गावामध्ये प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत आवास योजनांतर्गत घरकुलांचे प्रस्ताव तयार करण्यासाठी सरपंच व ग्रामसेवक स्वतः लाभार्थ्यांच्या घरी जावून त्यांना प्रोत्साहीत केले. बहुतांश लाभार्थ्यांकडे आवश्यक कागदपत्रे उपलब्ध नव्हती. त्याकरीता ग्रामपंचायतस्तरावर पंचायत समिती व तहसिल कार्यालयाचे सहकार्य घेवून कागदपत्र तयार करण्यासाठी कॅम्प आयोजित करून कागदपतत्र तयार करण्यात आली. त्यानुसार परिपुर्ण प्रस्ताव तयार करणेकामी लाभार्थ्यांनी आवश्यक ती कागदपत्रे ग्रामपंचायतीकडे सादर करताच ग्रामपंचायतीने सर्व घरकुल लाभार्थ्यांचे परिपूर्ण प्रस्ताव तयार करुन तालुकास्तरावर सादर केले. या सर्व लाभार्थ्यांना घरकुल देण्यासाठी गावकरी व ग्रामपंचायतीची तळमळ पाहून या कामी तालुकास्तरावरून आवश्यक ते सर्व सहकार्य करण्यात आले. तसेच तालुकास्तरावरून सर्व प्रस्तावांना तात्काळ मंजूरी देण्यात आली.

घरकुल मंजूर झाले परंतु सर्वांत मोठी अडचण होती ती घरकुल बांधकामासाठी जोगेची, याकरीता स्वतः सरपंच व ग्रामसेवक यांनी गावात पहाणी करून गावात उपलब्ध जागेची माहिती घेतली. तसेच घरकुल बांधकामासाठी जागा उपलब्ध करून देणेकरीता संबंधित विभागांशी वारंवार चर्चा केली. या लाभार्थ्यांना घरकुलाची किती आवश्यकता आहे, हे संबंधित अधिकारी यांना पटवून दिले. ग्रामपंचायतीच्या पुढाकाराने या भूमिहीन लाभार्थ्यांना घरकुल बांधकामासाठी जागा उपलब्ध झाली. त्यामुळे घरकुल लाभार्थ्यांचा जागेचा प्रश्न मार्गी लागला. अशा प्रकारे ग्रामपंचायत व लोकसहभागातून सर्व लाभार्थ्यांची घरकूले शौचालय व इतर नागरी सुविधासह पूर्ण झाली. या लाभार्थ्यांना हक्काचे पक्के घर मिळाल्याने सर्व लाभार्थी आनंदाने त्यांच्या स्वतःच्या घरात वास्तव्य करत आहेत.

त्यांच्या या यशस्वी कामगिरीसाठी ग्रामपंचायतीचे सरपंच श्री. सुभाष दत्ताराम लाड, उपसरपंच श्री. शरद राजाराम मांजरेकर, ग्रामसेवक श्रीमती अर्पिता आशिष शेलटकर व ग्रामाण गृहनिर्माण अभियंता श्री. परेश विश्वनाथ घाडीगावकर यांनी परिश्रम घेतले. त्यांच्या या यशात सर्व ग्रामस्थांचे मोलाचे सहकार्य लाभले आहे.







मा.आ.श्री. सुनीलबाबु केदार,
तालुक्यातील सर्व विकास कामाचे आढावा सभा
अमृत महा आवास अभियान तालुका स्तरीय पुरस्कार वितरण
2022-23






अमृत महा आवास अभियान ३.० पुरस्कार




स्वातंत्र्याचा
मा.ना.श्री.उदयजी सामंत




रमाई
आवास योजना

# मिडीया कवरेज

## आवास योजनेतील सर्वोत्कृष्ट ग्रामपंचायतींना पुरस्कार

## महाआवास अभियानात उत्कृष्ट सहभाग; वैजापूरमधील सहा ग्रामपंचायतींचा गौरव

## घरकुल लाभार्थ्यांना सहकार्य करा : आ. मानसिंगराव नाईक

शिराळा पंचायत समिती मध्ये आवास योजनेचा पारितोषिक वितरण समारंभ संपन्न

## ग्रामपंचायत, सर्कल व तालुकास्तरावर नामांकन 'महाआवास अभियान'पुरस्कारासाठी गावांची निवड

## पात्र लाभार्थ्यांना तातडीने घरकुलचा लाभ द्या

आ. महेश शिंदे : कोरेगाव पंचायत समिती आढावा सभा उत्साहात

## जिल्ह्यात शबरी योजनेतून होणार दीड हजारांवर घरकुलांचे बांधकाम

## जिल्हास्तरीय अमृत महाआवास अभियान २०२२-२३ अंतर्गत बैठक संपन्न

## कामात कुचराई केल्यास कर्मचाऱ्यांवर कारवाई

सीईओ मिनल करनवाल यांचा इशारा

## तुमच्याकडे घरासाठी जागा नसेल तर जिल्हा परिषद देणार जमीन !

## अपूर्ण असलेली घरकुले लवकरात लवकर पूर्ण करा

## ग्रामपंचायतींना एक महिन्याच्या आत पूर्ण खर्च करण्याबाबतच्या सूचना

मुख्य कार्यकारी अधिकारी दोडमिशे; कवठेमहांकाळ आढावा बैठक

## पोलिस बंदोबस्तात पैसे वसुल करणार : डॉ तुबाकले

## केंद्र व राज्य सरकार पुरस्कृत आवास योजनेंतर्गत घरकुल बाधकाम



(दिपक जडे/दै.धर्मयोध्दा)

**रायपुर** - येथे मराठवाडा मुक्तीसंग्राम दिन साजरा करत पिएम घरकुल २०२१-२०२२ योजनेचा शुभारंभ करण्यात आला.. २०३पैकी ६५ घर उद्दिष्ट साध्य करत आज १९ घराचे ग्रहप्रवेश करुन लाभार्थ्यांना घरांची मालकी देत राजेंद्र गाडेकर अध्यक्ष युवक काँग्रेस सेलू यांच्या हस्ते चावी देण्यात आली.. व यशवंतराव चव्हाण भटक्या जाती योजना अंतर्गत दोन घरांचे भुमीपुजन केले.. रमाई घरकुल योजना अंतर्गत ११ घराचे काम प्रगतीपथावर चालू असुन वाळू उपसाचा तांत्रिक अडचणी मुळे काही धिम्या गतीने सुरू आहेत सोबत पनल तांत्रिक अधिकारी शेख वालुरकर सरपंच आश्रोबा हिंगे, बापुराव गाडेकर,वैभव गाडेकर, सुरेश गाडेकर बाबासाहेब गाडेकर सेवक योगेश गिरी,जलील शेख व लाभार्थी.

## 'घरांची कामे तातडीने करा'

**वैजापूर** : वैजापूर तालुक्यात प्रधानमंत्री आवास योजना; तसेच शबरी व रमय योजनेअंतर्गत अपूर्ण असलेल्या घरकुलांची कामे ९० दिवसांच्या आत पूर्ण करा,' असे निर्देश गटविकास अधिकारी पल्लवी लांडे यांनी दिले.

तालुक्यातील महालगाव येथे विविध घरकुल योजना अंतर्गत सुरू असलेल्या कामांची त्यांनी पाहणी केली. तसेच घरकुलाचे काम पूर्ण झालेल्या लाभार्थ्यांना गृहप्रवेश करण्यात आला. भानुदास इंगोले, सुखलाल बत्तीसे व अशोक झिंजुर्डे या लाभार्थ्यांचा अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत गृहप्रवेश झाला. या वेळी नवीन मंजूर झालेल्या घरकुलाच्या कामाचे भूमिपूजन करण्यात आले. या कार्यक्रमाला सरपंच रोहिणी काळे, अभियंता राहुल आल्हाट, घरकुल कर्मचारी वैभव मतसागर, अमोल गलांडे, मच्छिंद्र आल्हाट, संपत जाधव, सतीश आल्हाट, प्रकाश हुमे, ग्रामपंचायत सदस्य सुरेश आल्हाट, कल्याण झिंजुर्डे, गणेश आहेर, मधुकर शेळके, नवनाथ गायकवाड, अंबादास जाधव, ग्रामविकास अधिकारी ईलियास शेख उपस्थित होते.

## कारकीनला गटविकास अधिकाऱ्यांच्या हस्ते तब्बल पन्नास घरकूलाचे भुमिपूजन



## सिद्धनाथ वाडगाव येथे रमाई व प्रधानमंत्री आवास लाभार्थीचा गृहप्रवेश



प्रतिनिधी | लासूर स्टेशन

गंगापूर तालुक्यातील सिद्धनाथ वाडगाव येथे सन २०२२-२४ वर्षात मंजूर झालेल्या रमाई आवास योजना, प्रधानमंत्री आवास योजना या नवीन घरकुल पूर्ण झालेल्या लाभार्थीचा १६ सप्टेंबर रोजी गृहप्रवेश करण्यात आला. तसेच या वेळी सरपंचपद रिक्त झाल्याने नवीन सरपंचांची निवड होईपर्यंत उपसरपंच सोनाली प्रमोद महाजन यांना प्रभारी सरपंच म्हणून पदभार देण्यात आला. या वेळी त्यांचा सत्कार ग्रामपंचायत कार्यालयात करण्यात आला. माजी सरपंच लीलाबाई खंडागळे, सदस्या सुप्रिया भालेराव, सदस्य प्रमोद भालेराव, जीवन बैनाडे, शिवराम खंडागळे, प्रमोद महाजन, ग्रामरोजगार सेवक भगवान वाघ, कलंदर शेख, शिवसिंग राजपूत यांच्या हस्ते घरकुलाचे उद्घाटन करून घरकुल लाभार्थीनी गृहप्रवेश केला. त्यांना शौचालयाचा वापर करावा, घर व परिसर स्वच्छ ठेवावा, घरासमोर वृक्ष लागवड करावी याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. या वेळी नोडल अधिकारी एस. एल. उज्जैनकर, ग्रामविकास अधिकारी कारभारी काळवणे, गायकवाड व लाभार्थी कुटुंब संजय भालेराव, वंदना थोरात, मिलिंद भालेराव आदी उपस्थित होते.



## बांधकाम पूर्ण केलेल्या लाभार्थींचा गृहप्रवेश

फर्दापुरात पाच लाभार्थींना हक्काचे घरकुल

प्रतिनिधी | फर्दापूर

फर्दापुरमध्ये घरकुलाचे पूर्ण बांधकाम केलेल्या लाभार्थींना गटविकास अधिकारी डी.एस. अहिरे यांच्या उपस्थितीत गृहप्रवेश देण्यात आला. तर उर्वरित लाभार्थींच्या घरकुलाचे भूमिपूजन करण्यात आले.

फर्दापूर (ता.सोयगाव) मधे २०२२-२३ या वर्षात शासनातर्फे एकुण २२ घरकुले मंजुर करण्यात आली होती. यात पंतप्रधान आवास योजना, शबरी आवास योजना, रमाई घरकुल आवास योजनेतून हि घरकुले मंजुर झाली होती. या पैकी १८ लाभार्थींनी घराचे काम पूर्ण केले. २ घरकुलांचे बांधकाम सुरू आहे. १८ पैकी पाच लाभार्थींनी १०० टक्के घरकुलाचे बांधकाम पुर्ण केल्याने त्यांना गटविकास अधिकारी डी.एस.आहिरे यांच्या उपस्थितीत गृहप्रवेश देण्यात आला. दोन घरकुलांचे काम सुरू असुन त्याची पाहणी करण्यात आली तर दोन घरकुलांचे भुमिपुजनही यावेळी अहिरे यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी ग्रामविकास अधिकारी सुनील मंगरूळे, सहायक अभियंता व्हि.एस. काटकर, अभियंता जाधव, अविनाश राठोड, ग्रा. पं. सदस्य फिरोज पठाण, भीमराव बोराडे, शेख जाकीर, सुरेश शेळके, गणेश वेल्हाळकर आदींची उपस्थिती होती.

## सहा ग्रामपंचायती 'सर्वोत्कृष्ट'

म. टा. प्रतिनिधी, वैजापूर

हैदराबाद मुक्तिसंग्राम दिनानिमित्त 'अमृत महाआवास अभियाना'अंतर्गत विविध योजनांत उत्तम कामगिरी करणाऱ्या तालुक्यातील सहा ग्रामपंचायतींना आमदार रमेश बोरनारे यांच्या हस्ते 'उत्कृष्ट ग्रामपंचायत' या पुरस्काराने गौरवण्यात आले.

हे अभियान २० नोव्हेंबर २०२२ ते पाच जून २०२३ या कालावधीत राबवण्यात आले. यामध्ये ग्रामीण भागात प्रधानमंत्री आवास योजनेत खंडाळा, माळीसागज व हिलालपूर या ग्रामपंचायतींनी उत्तम कामगिरी केली. राज्य पुरस्कृत शबरी आवास योजना व रमाई आवास योजनेत महालगाव, भिवगाव व लोणी बुद्रुक या ग्रामपंचायतींनी उत्कृष्ट कामगिरी केली.

मधुर व पोखरी गटांमध्ये १६२ घरकुले व जरुळ, सवंदगाव गटांमध्ये १३५ घरकुले पूर्ण झाल्याने ऋषिकेश वाघ व समाधान शेळके यांना आमदारांच्या हस्ते ग्रामीण गृहनिर्माण अभियंता पुरस्कार देऊन गौरवण्यात आले. या कार्यक्रमाला माजी उपनगराध्यक्ष साबेर खान, उपजिल्हाप्रमुख बाबासाहेब जगताप, जिल्हा बँक संचालक आप्पासाहेब पाटील, बाळासाहेब संचेती, हाजी अकिल शेख, गटविकास अधिकारी पल्लवी लांडे उपस्थित होते.

## स्वस्तातील वाळूचा मार्ग मोकळा

पाचपैकी दोन ठिकाणी डेपो सुरू; ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन

**सोलापूर : पुढारी वृत्तसेवा**



राज्य शासनाने जाहीर केलेल्या नव्या वाळू धोरणानुसार आता सर्वसामान्य लोकांना स्वस्तात अगदी ६०० रुपये प्रति ब्रास वाळू देण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. शासनाच्या वतीने प्रस्तावित करण्यात आलेल्या पाच ठिकाणांपैकी माळशिरस तालुक्यातील जांभुड व पंढरपूर तालुक्यातील चळे येथे आता डेपो सुरू झाले आहेत. ज्यांना वाळूची गरज आहे, त्यांनी विहित वेळेत ऑनलाईन अर्ज करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

राज्याचे महसूलमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी गरिबांना ६०० रुपये प्रति ब्रासप्रमाणे वाळू उपलब्ध व्हावी तसेच वाळूतील माफियागिरी थांबावी यासाठी नवे वाळू धोरण जाहीर केले होते. जिल्ह्यातील विविध पाच ठिकाणी वाळू डेपो करण्याचा संकल्प जिल्हा प्रशासनाने केला होता. त्यासाठी त्या वाळू घाटावरील लिलावही पुकारण्यात आले होते. त्यामध्ये माळशिरस तालुक्यातील डंबरे, जांभुड, वाफेगाव, तर पंढरपूर तालुक्यातील चळे आणि मंगळवेढा तालुक्यातील उचेठाण या ठिकाणी वाळू डेपो सुरू करण्यात आले होते. मात्र, पावसाळी वातावरण आणि रस्त्याच्या अडचणीमुळे वाळू डेपोमध्ये आवश्यक वाळू साठा होऊ शकला नाही. त्यामुळे त्या पाचपैकी केवळ माळशिरस तालुक्यातील जांभुड व पंढरपूर तालुक्यातील चळे या ठिकाणीच वाळू डेपो सुरू करण्यात आले आहेत. नागरिकांनी आता ऑनलाईन महाखनिज www.mahakhanij.maharashtra.gov.in या प्रणालीवर /वेबसाईटवर वाळू खरेदी मागणीची नोंद करणे आवश्यक आहे. या प्रणालीवर वाळू बुकिंगसाठी निश्चित वेळ उपलब्ध होणे आवश्यक आहे. त्यामुळे ३ सप्टेंबरपासून शासकीय डेपोतून उपलब्ध होणारी वाळू नागरिकांसाठी नमूद प्रणालीवर सकाळी १० ते १२ या वेळेत बुकिंगसाठी उपलब्ध करून देण्यात येत आहे.

### काही ठिकाणी रस्ता, तर काही ठिकाणी नागरिकांचा विरोध

जिल्ह्यातील माळशिरस तालुक्यातील वाफेगाव, डंबरे, जांभुड, तर पंढरपूर तालुक्यातील चळे व मंगळवेढा तालुक्यातील उचेठाण या पाच ठिकाणी वाळू डेपो सुरू करण्यास परवानगी दिली होती. मात्र, काही ठिकाणी रस्त्याची अडचण, तर काही ठिकाणी नागरिकांचा विरोध असल्याने या पाचपैकी केवळ दोन ठिकाणीच वाळू डेपो सुरू झाले आहेत.

## मुखेड तालुक्यातील घरकूल बांधकामास विलंब करणाऱ्या २ हजार ३३८ लाभार्थ्यांना नोटीस

देशोन्नती वृत्तसंकलन...

**मुखेड** ■ मुखेड पंचायत समिती कार्यालय अंतर्गत प्रधानमंत्री आवास योजनेतील १ हजार ७०५ व रमाई आवास योजनेतील ६३३ लाभार्थ्यांनी शासनाच्या निर्णयानुसार कागदपत्रे सादर केल्यानंतर त्यांना पहिला हप्ता म्हणून १५ हजार रुपये देण्यात आले, असे असतांनाही लाभार्थ्यांनी घरकूल बांधकाम करण्यास सुरुवात केली नाही. त्यामुळे पंचायत समिती कार्यालयाकडून तीन वेळा नोटीस देऊनही त्यांनी घरकूल बांधकाम सुरू केले नाही. या अनुषंगाने गटविकास अधिकारी यांनी या प्रकरणी न्यायालयात धाव घेतली. यावरून न्यायालयाने तालुक्यातील २ हजार ३३८ लाभार्थ्यांना लोकन्यायालयात हजर राहण्याची नोटीस जारी केल्याने घरकुल बांधकाम करण्यास विलंब करणाऱ्या लाभार्थ्यांचे धाबे दणाणले आहेत.

प्रधानमंत्री आवास योजना व रमाई आवास योजनेअंतर्गत सन २०१६ ते २०२३ दरम्यान २ हजार ३३८ लाभार्थ्यांना पहिला हप्ता प्रत्येकी १५ हजार रुपये देण्यात आला, पण त्या लाभार्थ्यांनी घरकुलाचे काम सुरु केले नाही, म्हणून गटविकास अधिकारी यांनी त्या लाभार्थ्यांना काम सुरू करण्यासंबंधी नोटीस बजावल्या परंतु त्या लाभार्थ्यांनी अद्यापपर्यंत घरकुलचे बांधकाम सुरू केले नसून अशा लाभार्थ्यांविरोधात गट विकास अधिकारी सी.एल. रामोड यांनी रक्कम वसुलीचा खटला दाखल करण्यापूर्वी तडजोडीसाठी प्रकरण राष्ट्रीय लोक अदालतमध्ये ठेवण्याची विनंती केली आहे. दरम्यान लाभार्थ्यांनी तात्काळ घरकुलाचे काम सुरू करावे, अथवा शासनाने दिलेले अनुदान परत करावे, असे न केल्यास लाभार्थ्यांविरोधात दिवाणी फौजदारी न्यायालयाने दिलेल्या नोटीसप्रमाणे आपले म्हणणे मांडावे, आपले प्रकरण सामंजस्याने मिटवण्याचा प्रयत्न करावा, घरकुलाचे काम सुरू केले नाही तर शासनाने दिलेले अनुदान परत करावे अन्यथा लाभार्थ्यांविरोधात योग्य ती कारवाई करण्यात येईल, अशी माहिती अधिक्षक जिल्हा न्यायालय - १ तथा अध्यक्ष तालुका सेवा समिती यांनी नोटीसद्वारे दिली आहे.(श.प्र.)

## अर्धापूरात जि.प.चे उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजकुमार मुक्कावार यांची घरकुल लाभार्थ्यांना भेट

### घरकुलाचे रखडलेले कामे सुरू करण्याच्या दिल्या सुचना

अर्धापूर/गुणवंत विरकर



अर्धापूर तालुक्यातील सर्वात शेवटच्या टोकाला असलेल्या पाटनूर व चेनापूर ग्रामपंचायतला जिल्हा परिषदचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजकुमार मुक्कावार,पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी मीना रावताळे यांनी प्रत्यक्ष गावात झालेल्या विकास कामाची, घरकुल बांधकाम ,घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन झालेल्या कामाची पाहणी केली.

ग्रामपंचायत घरकुल बांधकाम न करणाऱ्या लाभार्थ्यांशी सविस्तर चर्चा करून घरकुलाचे रखडलेले बांधकाम तात्काळ सुरू करण्याच्या सुचना दिल्या.पाटणूर येथील एका घरकुलाचे मार्क आउट टाकण्यात आले तसेच घरकुल बांधकामास भेटी देऊन लाभार्थ्यांशी यांच्या अडचणी समजावून घेण्यात आल्या व घरकुल बाधकाम करण्यासाठी मार्गदर्शन केले आहे.गावातील दिव्यांगाचे फार्म भरण्यात यावे. दिव्यांगाचा फॉर्म प्रत्यक्ष भरून घेऊन ग्रामसेवक यांना हे फॉर्म ऑनलाईन करण्यासाठी सूचना केले आहेत.गावातीलनागरिकाशी संवाद साधून आणि अडचणी जाणून घेतले आहे.यावेळी उपस्थित विस्तार अधिकारी विश्वनाथ मुंडकर,,शाखा अभियंता कादर ,अभियंता ज्ञानेश्वर इंगळे ,ग्रामसेवक रवी क्षीरसागर, स.डी.घुगे,समाधान पाटील शिंदे व सरपंच, उपसरपंच व ग्रामस्थ उपस्थित होते.

## नायगाव तालुक्यातील १ हजार २९६ घरकुलधारकांना बजावली नोटीस

## घरकुल योजनेचा पहिला हप्ता घेऊन काम सुरु न करणाऱ्या सतराशे लाभार्थ्यांना लोक न्यायालयाची नोटीस

## लोक अदालतीमध्ये घरकूल लाभार्थ्यांचा प्रतिसाद



देशोन्नती वृत्तसंकलन...

**हिमायतनगर** ■ तालुका विधी सेवा समिती न्यायालय हिमायतनगरच्या वतीने राष्ट्रीय लोक अदालतचे ९ सप्टेंबर रोजी आयोजन करण्यात आले होते.या राष्ट्रीय लोक अदालतीत गटविकास अधिकारी के. वि. बळवंत, कक्ष अधिकारी गायकवाड, विस्तार अधिकारी सुशीलकुमार शिंदे, प्रमोद टारफे, ग्रामसेवक ग्रामविकास अधिकारी, बांधकाम विभाग ऑपरेटर स्वप्नील भद्रे आदी उपस्थीत राहून ग्रामपंचायत कर वसुली प्रकरणे, पहिला आणि दुसरा हप्ता घेऊन काम पूर्ण न केलेल्या प्रधान मंत्री आवास योजनेतील आणि रमाई आवास योजनेतील लाभार्थ्यांशी चर्चा करण्यात आली. लवकरात लवकर घरकुलाचे काम सुरू करावे,अन्यथा दुसऱ्या नोटीसला घरकुलाची रक्कम परतावा करावी लागेल असे सुचविण्यात आले.यामध्ये अनेक लाभार्थ्यांनी घरकुल पूर्ण करण्याची लेखी हमी दिली आहे. लोक अदालतला चांगला प्रतिसाद मिळाल्याचे गटविकास अधिकारी कैलास बळवंत यांनी देशोन्नतीशी बोलताना सांगितले.



मा.खासदार, श्रीमती नवनीत राणा यांचे शुभहस्ते अमरावती येथे जिल्हास्तरीय महा आवास अभियान पुरस्कार वितरण

मा.मंत्री, वने, सांस्कृतीक कार्य, मत्सव्यवसाय श्री.सुधीर मुनगंटीवार यांच्या शुभहस्ते चंद्रपुर येथे जिल्हास्तरीय महा आवास अभियान पुरस्कार वितरण





मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता श्री.गुलाबराव पाटील यांच्या शुभहस्ते जळगाव येथे जिल्हास्तरीय महा आवास अभियान पुरस्कार वितरण

मा.मंत्री, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन श्री.संजय राठोड यांच्या शुभहस्ते यवतमाळ येथे जिल्हास्तरीय महा आवास अभियान पुरस्कार वितरण



"महाराष्ट्र शासनाचा एकच ध्यास,
२०२४ पर्यंत सर्वांसाठी आवास"



**संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष - ग्रामीण गृहनिर्माण यांचे कार्यालय**

४ था मजला, दक्षिण कक्ष, सिडको भवन, सी. बी. डी. बेलापूर, नवी मुंबई - ४००६१४
Email ID : directoriayruralhousing@gmail.com
दुरध्वनी क्र. : ०२२-२७५६१८२४